

...रामपूर

दोन ठोके
दोन जगे

# माणूस

चाळीस पैसे



२१ फेब्रुवारी १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक अडतीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३०   दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

आपला माणूस दि. १०–१–७० मधील लेख वाचला. त्याबद्दल बऱ्याच धीमेपणाने आपणास लिहीत आहे. लिहिण्यात काही तांत्रिक चुका झाल्यास त्या गाळून आशय घ्यावा.

आपल्या लेखास काही ऐतिहासिक सत्य आहे हे जाणून तो वाचला जाईल. स्वतः मी ज्यांच्याबद्दल लिहिणार आहे त्यांचा मुलगा असल्याकारणाने आपल्याला काही ऐतिहासिक गोष्टींचे विस्मरण झालेले पाहून आश्चर्य व वाईट वाटले.

केवळ जुन्या गोष्टींचे पुनःस्मरण याच भूमिकेतून मी अनेक गांधीवादी व काही पुढारी यांच्या लिखाणात डोकावून पाहिले तेव्हा असे आढळून आले की–केवळ विस्मरण म्हणून नव्हे तर जाणूनबुजून माझे वडील कै. बाळूकाका कानिटकर यांचे नाव गाळले गेले. उदाहरणार्थ कै. काकासाहेब गाडगीळ यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकात ही हे आपणांस आढळून येईल. इतरांच्याबद्दल अपेक्षा नव्हती.

माझ्या हिशेबी, सच्चे गांधीवादी फक्त माझे वडीलच होते. गांधीवाद हा पूर्णपणे महात्माजीसुद्धा आचरू शकले नाहीत. तो योग्य का अयोग्य ही चर्चा मला करावयाची नाही.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्र काल्पनिक.

एकोणीसशे तीसच्या चळवळीचा आपण उल्लेख केला त्यात माझ्या वडिलांचे स्मरण आपणास झाले नाही–आपण मुद्दाम केले असे मला म्हणायचे नाही. प्रत्यक्ष बाळूकाकांना "क–का–कि"चा लोभ नव्हता. तेव्हा त्यांना कीर्ती मिळावी व दूरान्वये त्या कीर्तिशी आमचा संबंध असावा व लाभ व्हावा असेही वाटत नाही.

मला स्वत:ला मागील गोष्टींचे स्मरण केले म्हणजे ते गोटीराम काची,..'नहीं रखना नहीं रखना' म्हणणारा गिरी नारायण, वगैरे लोक आठवतात. त्यांचे आदरपूर्वक स्मरण केव्हातरी तुमच्यासारख्या साहित्यिकांनी करावे असे वाटते.

तुमची माझी ओळख नाही, परंतु तुम्ही ज्या किसान मोर्चामध्ये सामील होतात त्यात मीही होतो. त्यामुळे अप्रत्यक्ष जवळीक आहे म्हणून हे पत्र.

**डॉ. मो. ग. कानिटकर,** खडकी पुणे ३

**स. म. वि. वि.**

आपल्या पत्राबद्दल आभार. वाचकांकडून अशी पत्रे आलेली मला आवडतात. आपले वडील कै. बाळूकाका कानिटकर यांना मी चांगला ओळखत होतो. गांधींच्या चळवळीत त्यांनी सर्वस्वाचा त्याग केला आणि तुम्हा सर्वांच्या जीवनाचा होम केला हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. चौकाचौकातल्या त्यांच्या खड्या आवाजातल्या सभाही ऐकल्या आहेत. त्या वेळेच्या सच्च्या गांधीवाद्यांत तुमचे वडील अग्रगण्य होते. खरोखर अगदी खरे गांधीवादी किती होते हा तुमच्याप्रमाणे मलाही प्रश्न आहे. महात्मा गांधींच्या एकंदर आचरणात तत्त्व किती आणि राजकीय डावपेचाचा भाग किती हे सांगणे कठीण.

माझ्या लेखात मी तीस सालच्या चळवळीच्या संदर्भात देव–गाडगीळांची, व एस. एम., गोरे, यांची नावे घेतली. ती पुढारी म्हणून. कै. बाळूकाकांना पुढारीपणाची झळाळी कधीही प्राप्त झाली नव्हती. एस. एम. व गोरे यांच्याइतकाच श्री. शिरू लिमये यांनीही त्याग केला आहे. पण त्यांचे नाव आज कोणी घेत नाही. माणसाला पुढारीपण अनेक गोष्टींमुळे मिळत असते. कर्तृत्व आणि नशीब या दोन्ही गोष्टींवर ते अवलंबून असते. बाळूकाकांनी गांधींच्या चळवळीत हात राखून काम केले असते, घरदार इस्टेट नि दागिने शाबूत राखले असते, आणि राष्ट्रीय शिक्षणाचा उद्घोष करीत असतानाच तुम्हा मुलाना इंग्लंडच्या शाळेत शिकायला पाठवले असते तर कदाचित त्यांना पुढारीपण प्राप्त झाले असते. कै. काकासाहेब गाडगीळांनी 'पथिक'मध्ये बाळूकाकांचा उल्लेखही केला नाही हे वाचून मी सर्द झालो.

तीस-बत्तीस सालच्या पुण्यातील चळवळींचा उल्लेख करताना बाळूकाकांचे नाव टाळता येणार नाही. मी अर्थातच चळवळीचा इतिहास लिहीत नव्हतो. त्यामुळे माझ्या हातून ती चूक घडली. श्री. हरीभाऊ फाटकांच्या नावाचाही उल्लेख मी केला नाही हे लक्षात घ्यावे. तुमच्या पत्रातील गोटीराम काची आणि

गिरीनारायण यांचे उल्लेख वाचून जुन्या स्मृती जाग्या झाल्या. श्री. गिरीनारायण घोड्यावर बसून मिरवणुकीच्या अग्रभागी असत असे स्मरते. "टोपीवाले दादा! ... तुम्ही जाणार कधी आपल्या गावा" ही लावणी गोटीराम काची ठसक्यात म्हणत असत. त्यांच्याबद्दल खरोखरच कुणीतरी साहित्यकाने लिहायला हवे. तुमच्या पत्राबद्दल पुन्हा एकदा आभार.

**श्री. ज. जोशी**

आपला ७ फेब्रुवारीचा अंक पाहिला. श्री. शरद गोखले यांनी लिहिलेले 'सत्यकाम' या सिनेमाचे परीक्षण काळजीपूर्वक वाचले. त्या परिक्षणातील 'अखेरच्या क्षणी पत्नी व मुलासाठी सत्यप्रिय तडजोड करतो' हे वाक्य खटकले. या वाक्याने श्री. गोखले यांनी सत्यप्रिय या व्यक्तिरेखेच्या महानतेवर संपूर्ण बोळा फिरवून त्याला सर्वसामान्यांच्या पातळीवर आणून सोडला आहे असे निश्चितपणे वाटते. सत्यप्रिय व त्याची पत्नी रंजना या दोघांचे जीवन एकजीव झाले आहे. व सत्यप्रियचे कार्य किंवा वृत्ती रजना त्याच्या मृत्युनंतर पुढे चालविणार आहे, हे दाखविण्यासाठी हा अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंग दिग्दर्शकांनी योजलेला आहे.

प्रसंग थोडक्यात असा आहे—सत्यप्रियने सही केलेले कागदपत्र रंजना फाडून टाकते. त्याची सही पाहून ती विलक्षण गहिवरते व 'यह तुम्हे मालुम था ना ?' असा प्रश्न विचारते व सत्यप्रियही खुणेने 'होय' असे सांगतो. (रंजना ते कागदपत्र फाडून टाकणार याबद्दल त्याची शंभरटक्के खात्रीच असते. तडजोडीचा तिथे पुसटसादेखील प्रश्न नसतो!) दोघांच्याही डोळ्यांत अश्रू जमा होतात व रंजना सत्यप्रियला बिलगते. असा तो प्रसंग आहे.

थोडक्यात तडजोडीचा प्रश्नच उपस्थित झालेला नसतो.

गेल्या महिन्यात मुंबईतल्या एका 'सिने-गोअर्स क्लब'तर्फे हृषिकेश मुखर्जी यांच्या भाषणाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी श्री. मुखर्जी व जमलेले श्रोते यांच्यामध्ये 'सत्यकाम'विषयी प्रश्नोत्तरेही झाली. एका श्रोत्याने 'शेवटी सत्यप्रियने कागदपत्रावर सही करून तडजोड केलीच ना ?' असा प्रश्न विचारला होता व मुखर्जींनी ती तडजोड कशी नव्हती याबद्दल सांगितले होते. सत्यप्रिय या व्यक्तिरेखेची महातमताच त्या एका प्रसंगात पकडलेली असल्याने, तसा प्रश्न उपस्थित करून त्या श्रोत्याने आपल्या अज्ञानाचेच प्रदर्शन घडवले !

—तोच प्रकार श्री. गोखले यांच्या बाबतीत दुर्दैवाने झाला असे म्हणावेसे वाटते ! जाता जाता, तसे परीक्षण खरोखरच चांगले झाले आहे; पण ! अन् हा 'पण' फार महत्त्वाचा होता म्हणून हा सारा प्रपंच !

फेब्रुवारी, ५ **विजय कापडी,**

मुलुंड.

□ □ □

# मार्ग

'परवा तुमची सारखी आठवण येत होती' समोरून सायकलवरून येणाऱ्या आमच्या पूर्वीच्या पवार दूधवाल्यांना थांबवून मी म्हटले.

घागरी रिकाम्या भरून ते आता परत गावाकडे निघालेले होते. पुण्यापासून दहा–बारा मैलांवर, सिंहगडच्या पायथ्याशी वसलेले गोन्हे हे त्यांचे गाव. रोज सकाळी सायकलीला घागरी बांधून पुण्याला यायचे, दिवसभर रतीबे घालायची, संध्याकाळी मुक्कामाला पुन्हा गावाकडे. रोज पंचवीस–तीस मैल सायक्लिंग तर सहजच होत असावे. ऊन्ह नाही, वारा नाही, पाऊसकाळात तर भिजत, वाहते ओढे ओलांडून यायचे–जायचे ! वर्षानुवर्षे हा त्यांचा क्रम सुरूच आहे.

'का बुवा ? आमची आठवण व्हायचे कारण ?' सायकलवरून उतरून पवारांनी मला विचारले.

'तुमच्या गावावरून परवा गेलो. डॉक्टर (पळसुले) तुम्ही–आम्ही गेलो होतो तसेच !' मी.

'मग घराकडे आला नाहीत ?' पवार.

'थोडी वाट वेगळी पडली' मी.

'कसे गेलात ?'

'अगदी अचानक ठरलं. मला वेल्ह्याला जायचं होतं. सकाळी स्टँडवर गेलो. जत्रेचा दिवस असल्याने गाडीला फार गर्दी होती. मनाने तर घेतले होते, आज वेल्ह्याला जायचेच. शेजारी सिंहगडची एस्. टी. रिकामी उभी होती. आठवले, दहा–बारा वर्षांपूर्वी आपण तिघेजण सिंहगडला वळसा घालून पायी वेल्ह्याला पोचलो होतो. पंधरा–सोळा मैलांची चाल पडली होती. म्हटलं, बघू पुन्हा जमतं का. म्हणून सिंहगड गाडीत बसलो.' मी.

'उतरलात कुठे ? वाट कुणी दावली ?'

आपली पूर्वीची वाट वेगळी होती. डोंजाळा उतरून आपण रात्री तुमच्या घरी मुक्काम केला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी खानापूरवरून, पाब्याची खिंड ओलांडून आपण संध्याकाळी वेल्ह्यात पोचलो, तिसरे दिवशी सकाळी आपण तोरणा गडावर होतो. या वेळी थेट सिंहगडच्या पायथ्याला उतरलो. तिथेच एक वाटाड्या भेटला. प्रवाश्यांना सिंहगड दाखविण्याचे काम तो नेहमी करीत असतो. तिथल्याच

## श्री. ग. माजगावकर

अतकरवाडीचा. तो बरोबर यायला तयार झाला. निम्मा डोंगर या वाटेने चढावा लागतो. मेटावर पोचले की पश्चिमेकडे वळायचे. तशीच आणखी दोन मेटे लागली. उजव्या हाताला खानापूर–आपलं गोऱ्हं–सगळं वरून दिसत होतं. ' मी.

' उतरलात तेव्हा गाव कोणत लागलं ?' पवार.

' विंझरच्या पुढचं दापोडं. तिथून चार मैल सरळ गाडीरस्त्याने वेल्हे. ' मी.

' म्हणजे डोंगरावरूनच सगळी चाल झाली. '

' होय. पण त्रास काही झाला नाही. मागच्या ट्रिपची सारखी आठवण येत होती.'

' त्या वेळची गोष्ट वेगळी होती. बरं, तिकडचं पीकपाणी ? एका पावसाने पार दडी दिली आहे आमच्याकडे...' पवार.

' वाचलं खरं परवा वर्तमानपत्रांत. मुळशी भागातील शेतकऱ्यांनी मामलेदार कचेरीवर एक मोर्चा नेला होता तो. तुम्ही होतात का त्यात ?' मी.

' नाही. आता सगळं सोडून दिलं ते. पाच वर्षं पंचायतीचं काम केलं. भानगडीच फार. एक व्यवहार सरळ नाही. आपल्याला ते काही मानवलं नाही. '

' आता गावात निवडणुकीची तयारी सुरू असेल ?'

' पाच वर्षांत कुणी फिरकले नाही गावाकडे. गावकरीही आता तयार आहेत. टाक इतके पैसे देवळाला नाही तर शाळेला. नाहीतर फुट–हो, सरळ सौदा. '


' दिल्लीवाल्यांच्या नावाने आपण उगाच ओरडायचे. गावात आपणही दुसरे काय करतो आहोत ?' मी.

' खरं आहे ' म्हणून पवार हसले. आणखी दोन-चार वाक्ये बोलून आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

' कशाला कोण येतय इथं मरायला. गांडुळ खाऊन जगणारी माणसं '...सिंहगडच्या पश्चिम उतारावरील कळकीच्या मेटावर विसाव्यासाठी बसलो असता ती म्हातारी चटकन बोलून गेली.

मी सहज आधी गंमतीने म्हटल होतं–' काय भावाला चहापाणी वगैरे केलं की नाही ?' माझ्यावरोबर आलेल्या अतकरवाडीच्या वाटाड्याची म्हातारी बहीण

[ पृष्ठ ६२ वर ]



# दिल्ली

## दिनांक १० फेब्रुवारी

### शेख अब्दुल्लाचा साक्षात्कार

या आठवड्याची सनसनाटी बातमी म्हणजे शेख अब्दुल्ला भारतीय आहे ! गेल्या आठवड्यात गफारखानांनी भरविलेल्या मेळाव्यात अब्दुल्लाने "आम्ही भारतीय" असा ओझरता उल्लेख केला तेव्हा ती एक "स्लिप ऑफ द टंग" असावी अशा समजुतीने अनामिकाने तिच्याकडे विशेष लक्ष दिले नाही. परंतु दोन दिवसांपूर्वी गफारखानांच्यासमवेत पत्रकार–परिषदेत बोलताना अब्दुल्लाने जी थक्क करणारी विधाने केली आहेत, ती पाहून खरोखरीच शेखसाहेबांना साक्षात्कार झाला आहे की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. नतद्रष्ट भारतद्वेष व जालीम जातीयता यांच्या आधारावर जो शेख अब्दुल्ला एकेकाळी काश्मीरचा 'सुलतान' होण्याची स्वप्ने पाहत होता त्याचे हे परवाचे भाषण 'विश्वास ठेवा अगर ठेवू नका' या सदरात मोडणारे आहे, याची थोडी वानगी.

या देशातल्या अल्पसंख्य मुसलमान जमातीने सध्याची परिस्थिती ओळखून स्वतःची मनोवृत्ती बदलली पाहिजे. येथल्या मुसमानांनी या देशालाच आपले जीवन समर्पण केले पाहिजे. इतर कुठल्याही देशाचा दरवाजा–पाकिस्तानचादेखील–त्यांच्यासाठी उघडा नाही. हिंदु मुसलमान हा भेदभाव ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुद्दाम निर्माण केला होता व त्यांनी या दोन जमातींना एकमेकांपासून दूर ठेवले. पण आता तो जमाना गेला आहे. आता आपल्या देशात लोकशाही आहे, व लोकशाहीच्या तत्त्वानुसार बहुसंख्य जमातीच्या (म्हणजे हिंदूंच्या) मताचा मान राखला गेला पाहिजे. हिंदुस्थान हा आपला देश आहे व या देशाच्या प्रगतीची सर्व जबाबदारी आपण अंगावर घेतली पाहिजे. मुसलमानांनी, हिंदु हे तुमचे मोठे भाऊ आहेत, तेव्हा तुम्ही त्यांचे मन जिंकले पाहिजे. अन् हिंदूंनो, मुसलमान हे तुमचे धाकटे भाऊ आहेत, तेव्हा तुम्ही त्यांना प्रेमाने जवळ घ्या !

हियर हियर ! शेख अब्दुल्लाने या भाषणात जे अजब विचार प्रकट केले आहेत ते खरोखरीच त्याला स्वतःला पटले असतील तर ती एक विस्मयजनक "हार्ट ट्रान्स्फर्ट केस" म्हणावी लागेल.

## जमायच्या आधी मोडलेली सोयरीक ?

उत्तर प्रदेश व बिहारमध्ये सिंडिकेट-इंडिकेटचे जे उलटसुलट डावपेच चालले आहेत त्यामुळे परिस्थिती इतकी घोटाळ्याची झाली आहे की आजची परिस्थिती व आणखी दहा दिवसानंतरची परिस्थिती यांत जमीन–अस्मानाचा फरक असू शकेल. इतकेच काय, पण आजची परिस्थिती नक्की काय आहे हे सांगणेदेखील अवघड होऊन बसले आहे. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशात इंदिरा-काँग्रेस व चरणसिंग यांची सोयरीक जमली आहे की जमायच्या आधीच ती मोडली आहे हे कुणालाच छातीवर हात ठेवून सांगता येणार नाही. कारण गुप्ताजींना खाली ओढण्याचे पुण्यकर्म दोघांनी मिळून करायचे असे ठरले तरी मुख्यमंत्री चरणसिंगांनी व्हायचे की त्रिपाठींनी या यक्ष प्रश्नाचे उत्तर धर्मराजालाच काय पण प्रत्यक्ष पक्षालाही न सापडण्याइतके कठीण झालेले दिसते. उत्तर प्रदेशातील विरोधी काँग्रेसचे अध्यक्ष मोहनलाल गौतम यांनी नुकतीच अशी "आतली" माहिती दिली की इंदिराजींनी येन केन प्रकरेण गुप्ताजींना खाली ओढण्याचा निश्चय केल्याने त्यांनी चरणसिंगांना मुख्यमंत्री करायचे ठरवले. त्यांनी अशीही अंदरकी बात सांगितली की, चरणसिंगांनाही फार दिवस टिकू देण्यात येणार नाही. कारण मध्यावधी निवडणुकीचा प्रसंग आलाच तर त्या वेळी उत्तर प्रदेशात गुप्ता किंवा चरणसिंग यापैकी कोणाचेही सरकार असण्यापेक्षा अध्यक्षीय राजवट इंदिराजींना अधिक परवडेल. पण एकीकडे या बारेमाप वावड्या उठविल्या जात असताना दुसरीकडे भाक्रांदने घोषणा केली आहे की सरकारी काँग्रेसशी सध्या तरी "कर्तव्य" नाही. गुप्ता-संहाराचे उद्दिष्ट कायम, पण त्या कामी एकला चालो रे !

उत्तर प्रदेशात हा घोटाळा तर बिहारमध्ये इस्सेभी जादा. इंदिरानुचर दरोगाराय यांच्या सरकार स्थापनेच्या प्रयत्नांना फळ येणार, की नाही हे अजूनही गुलदस्तात आहे. प्रसोपाचा पाठिंबा मिळाला तर आणखी काही सजातीय मते खिशात पडतील हे माहीत असल्याने प्रसोपाचा पाठिंबा हाच आपला तरणोपाय आहे हे दरोगाजी ओळखून होते, तेव्हा प्रसोपाने प्रथम नाकारलेला पाठिंबा नंतर दिला तेव्हा दरोगारायांना अर्धी लढाई जिंकल्याचा आनंद होणे साहजिक होते. दरम्यान संसोपा, जनसंघादी मंडळींचे संयुक्त विधायक दल उभे राहिल्याने ते गडबडले. इतक्यांत या 'संविद'चे संसदीय पुढारी रामानंद तिवारी यांनी कोलांटी उडी मारल्याने संविद कुठले असा गवगवा झाला व दरोगाजींना हायसे वाटले. पण हाय, तिवारी असोत की नसोत. संविद कायम आहे असा बाकीच्या मंडळींनी पवित्रा घेतल्याने पुनः दरोगाराय यांचे धाबे दणाणले आहे.

तिवारींच्या फुटीरपणाला संसोपाचे सांप्रतचे अध्यक्ष कर्पूरी ठाकूर व पूर्वीचे अध्यक्ष एसेम यांचा पाठिंबा आहे. एसेमनी तर दिल्लीहून असा निरोप पाठविला

आहे की त्यांच्या गटाने आपला बाणा सोडू नये व तिवारींना पक्षाने कार्यकारिणीतून काढून टाकण्यात आले तरी "पक्षात राहून समाजवाद बळकट करण्याचे कार्य करीत राहावे.' एसेम-गटाच्या विरुद्ध राजनारायण गट आहे. अर्थात प्रत्येक गट आपण अधिक सामर्थ्यशाली आहोत असा दावा करीत असला तरी कोणते पारडे खरोखरीच जड आहे हे सांगणे सध्या तरी कठीण आहे. या गटांच्या मारामारींत संसोपा दुभंगणार काय? कर्पूरी बाबूंनी म्हणे दिल्लीला निरोप पाठविला आहे की आम्हांला पक्ष फोडण्याची इच्छा नाही पण आमच्यावर हा प्रसंग लादण्यात येत आहे. तात्पर्य काय, समाजवादाच्या नावाखाली काँग्रेसची दोन शकले करणाऱ्या इंदिराजींच्या पावलावर पाऊल ठेवून प्रसोपा व संसोपा हे दोन्ही समाजवादी पक्ष विभाजनाच्या वाटचालीला निघालेले दिसतात.

— अनामिक




# खामोषी

विजय तेंडुलकर

'मनोविश्लेषणात्मक' हा शब्द आपल्याकडे फार सैलपणे वापरला जातो. ज्याची गती भलतीच संथ आहे आणि ज्यात कृतीपेक्षा बोलणे जास्त आहे अशा कशालाही आपण मनोविश्लेषणात्मक हे लेबल पोस्टाचा ठसा ठोकावा तसे ठोकून देतो. खरोखरीच्या मनोविश्लेषणात्मक कथेत, नाटकात नाहीतर चित्रपटात ही दोन्ही लक्षणे कमजास्त प्रमाणात असून वर पुन्हा खरेखुरे मनोविश्लेषण किंवा मानवी मनाचे शास्त्रशुद्ध विच्छेदन असावे लागते. मानवी मन-तथाकथित निरोगी मानवी मन देखील–लहानमोठ्या गाठींनी (Complexes) भरलेले असते; क्वचित वर वर निरोगी वाटते अशा मनाला आतून एकादी व्याधी पोखरीत असते आणि रोगी मने तर असतातच. अशा मनांचे केवळ दिग्दर्शन वा दर्शन म्हणजे मनोविश्लेषण नव्हे. एरवी सर्व वास्तवदर्शी नाटके मनोविश्लेषणात्मक होतील, अशा मनाच्या नेमक्या मर्मावर बोट ठेवून त्याचीच गंभीर आणि प्रामुख्याने चिकित्सा म्हणजे मनोविश्लेषण, असले जिकीरीचे आणि जाणकार मनोविश्लेषण आपल्याकडे कमीच, नुसती हूल फार.

या परिस्थितीत मनोविश्लेषणात्मक हिंदी चित्रपट म्हटल्यावर आपण हुशारलो. पुन्हा तोही एका बंगाली गाजलेल्या चित्रपटावरून (दीप जेले जाय) तयार केलेला आणि हा गाजलेला बंगाली चित्रपट एका गाजलेल्या बंगाली कादंबरीवरून बेतलेला (हिचेही नाव दीप जेले जायच.) त्यात या बंगाली चित्रपटावरून हिंदी चित्रपट तयार करण्याचे हक्क मुळात दाक्षिणात्त्य पु. ल. देशपांडे (म्हणजे तसेच लोकप्रिय आणि दानशूर) शिवाजी गणेशन् यांनी घेतलेले; त्यांजकडून हिंदी बंगाली पार्श्वगायक हेमंतकुमार यांनी ते खरेदी केले म्हणे, दिग्दर्शक असित सेन–हिंदी 'आखिरी रात' फेम. प्र. भू. आपली वहिदा उर्फ वहिदा रेहमान. (हिच्या तोंडाकडे पहात आपण 'गाइड' चित्रपट ऐकला.) आणि पुन्हा अशा या चित्रपटाचा सार्वत्रिक प्रदर्शनापूर्वीचा खास खेळ मुंबईच्या प्रभात चित्रमंडळ नामक चित्रपटशौकीनांच्या मंडळासाठी ठेवलेला.

म्हणून गेलो. आरंभच वजनदार झाला. मानसिक उपचारांच्या इस्पितळाची अनेकमजली अद्ययावत भव्य इमारत. वरून खाली रस्त्यावर एक पांढरी लांब 'कार' येऊन उभी रहाते. तिच्यापर्यंत माणसांचे काही ठिपके जातात. मग त्यातले

काही कारमध्ये चढतात. काही बाहेर हारीने उभे. कार निघते. ठिपके रहातात. इमारतीची गच्ची. तिच्यात एक नर्स खाली पहात उभी. तिचे डोळे भरतात. भलतेच भरतात. स्वतःला ती शर्थीने सावरते आहे. ही अर्थातच वहिदा. हिला रडता फार चांगले येते. ही कधीही (पडद्यावर) रडली तर पुढे होऊन डोळे पुसून उगी उगी करण्याचा मोह प्रेक्षकांना होतो.

आरंभाने ही अशी पकड घेतली.

मग आले इमारतीतले मानसिक उपचारांचे इस्पितळ. वेड्यांचे वेचक नमुने. हेही वेडे वाटत होते. यात चष्मा आणि गणवेष चढवून सिस्टर ललिता पवार. सरंजामशाही किंवा एकदम गावरान ऐसपैस भूमिका उत्तम करणाऱ्या ललिताबाई या भूमिकेत अवघडलेल्या वाटल्या. मग पुन्हा नर्स वहिदा रेहमान, डोळ्यांचे पाणी पुसून, कर्तव्यकठोर सुकुमार मुद्रेने. हिचे या चित्रपटातले नाव राधा.

पुन्हा वेड्यांचे नमुने, सिस्टर ललिता पवार नंबरवार हजेरी घेत असताना.

आणि चोवीस नंबर उच्चारला गेला. त्या नंबरचे कोणी आले नाही. त्या खोलीतून बाहेर आली नर्स राधा, खोली ओकीबोकी. नर्स, दुसरी नर्स, सिस्टर यांचे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप.

चोवीस नंबर बरा होऊन घरी गेला होता. कारमधून गेला तो तोच. त्याचे नाव देव. नर्स राधाला खिन्न आणि रडवेले करणारा हाच तो देव.

आता दिसले इस्पितळाचे मुख्य डॉक्टर झालेले नाझिर हूसेन; इस्पितळाच्या कमिटीपुढे बोलताना. नाझिर हुसेन हे असल्या भूमिकात आणि तदनुषंगिक चित्रविचित्र दाढीमिशा आणि सूटबुटात आजवर पुष्कळ घोळलेले आणि रुळलेले हिंदी रुपेरी पडद्यावरचे ज्येष्ठ नट. तर हे डॉक्टर चोवीस नंबरच्या जागेवर नवीन कोणता पेशंट घ्यावा याविषयीची आपली इच्छा कमिटीला सांगत होते. ही चोवीस नंबरची जागा प्रायोगिक स्वरूपाचे उपचार करून पहाण्यायोग्य पेशटसाठीच आधीपासून ठेवलेली. आलेल्या केसेसपैकी एक केस त्यांनी पसंत केली. नाव अरुण. याची मानसिक व्याधी ॲक्यूट मॅनिया. याच व्याधीतून आधीच्या नंबर चोवीसाला बरे करून घरी पाठविण्यात आलेले होते. आणि डॉक्टरना आपला यशस्वी प्रयोग पुन्हा पडताळून पाहण्याची इच्छा होती. डॉक्टर कमिटीला सांगत होते की आपल्याकडे राधा म्हणून नर्स आहे (ही कसल्या तरी कामानिमित्ताने याच वेळी त्या दालनात डॉक्टरांनागून हळूच येऊन टेबलाच्या खणात काही शोधीत होती;) तिच्यामुळे आपण आधीची केस बरी करू शकलो आणि नवी केसही राधाच्या मदतीने बरी करू शकू अशी उमेद आहे. (टेबलाच्या खणात शोधाशोध करणाऱ्या राधाच्या मुद्रेवर सराईत आणि कामसू नर्सची निर्विकार एकाग्रता होती;) चोवीस नंबरच्या जागेवर अरुण या ॲक्यूट मॅनिया नामक मानसिक व्याधीने ग्रस्त पेशंटला घेण्यात आले.



हे डोळे बरंच काही बोलतात, सांगतात...

राधाची मदत आधीच्या देवनामक पेशंटला बरे करण्यात झाली होती तिचे स्वरूप काय होते ? राधाने देवच्या प्रेयसीची भूमिका त्याच्यावरल्या उपचारात बजावली होती. मायेने, खुबीने, त्याच्या प्रेमभावनेला उत्स्फूर्त वाटणारी साथ देव

हळूहळू त्याच्या भ्रमातून त्याला वास्तव जगात आणले होते. अरूणच्या बाबतीत तिने तेच करावे अशी डॉक्टरांची अपेक्षा होती. देवप्रमाणे अरूणलाही त्याच्या प्रेयसीने दगा दिला होता आणि त्या धक्क्याने भ्रमिष्ट झालेल्या अरुणला माणसात आणण्यासाठी राधाला त्याची प्रेयसी बनून त्याला माया, प्रेम आणि समजूत देणे, बरे करणे, आवश्यक होते.

नर्स राधा आज्ञाधारक मुद्रेने पण ठाम स्वरात म्हणाली, नाही, सर. मला हे काम जमणार नाही. मी हे पुन्हा करणार नाही.

## देखणे दर्शन

समजूतदार डॉक्टरांनीं मग दुसऱ्या नर्सची योजना या कामी केली, पण तिला हे नाजूक काम जमेना. मोले घातले रडाया तशी मोले प्रेम करण्याला लावल्यासारखी ती वागू लागली आणि डॉक्टरांच्या अनुपस्थितीत पेशंट अरुण फारच बिनसला. पिसाळला. विजेच्या धक्क्यांचा उपचार त्यावर करण्यात येत असता नर्स राधाने धावत जाऊन हा अविचाराने होणारा उपचार थांबवला आणि नकळत ती या केसमध्ये गुंतली. अनावरपण अरुणच्या दगाबाज प्रेयसीपर्यंत पोचली. अरुण तिच्यावर अवलंबून राहू लागला, तिची वाट पाहू लागला, तिच्यात मनाने गुंतू लागला—झपाटयाने.

राधापुढे संकट उभे राहिले. आधीच्या देवची ती प्रेयसी बनली; बरा होऊन देव निघून गेला. त्याचे लग्न देखील ठरले होते. आता अरुणची ती प्रेयसी होती. अरुण बरा होणार होता. आणि तोही आपल्या जगात निघून जाणार होता, सुखी होणार होता. राधा मात्र त्या इस्पितळातच एक नर्स म्हणून जगणार होती. पेशंटस बरे झाले की तिला विसरत होते पण ज्याच्यावर एवढं जीव लावून प्रेम केले, ज्याचे प्रेम घेतले, त्याला विसरता येणे राधाला अशक्य होत होते. हे प्रेम हा पेशंटलेखी आणि डॉक्टरलेखी उपचार होता. राधाच्या दृष्टीने तिचे तेच जगणे होत होते; तिचे तरुण स्त्रीहृदय त्यात सर्वस्वाने गुंतत होते. तिचा हा अभिनय नव्हता आणि म्हणूनच पेशंटला त्याचा मोठा आधार मिळत होता. देव गेला, तिला विसरल पण देवाला ती विसरू शकली नव्हती आणि मरणाच्या यातना तिला त्या दिवसांच्या स्मरणाने नंतर झाल्या होत्या. आता पुन्हा अरुण बरा होणार होता आणि—

राधाने नंतरच्या उपचार योजनेत पराकोटीचा संयम केला, काळीज गुंतू नय आणि तरी पेशंटला योग्य तो मानसिक आधार मिळावा म्हणन स्वतःच्या भावनांशी निकराचे झगडे केले. परतीची वाटच आता उरली नव्हती. पेशंट अरुण ही तिची जबाबदारी होती.

अरुण पूर्ण बरा झाला. तो इस्पितळातून जाण्याआधी दोन दिवस फार फार मलूल राधा डॉक्टरांपुढे गेली. म्हणाली, प्लीज, सर, पेशंटला बरे वाटले आहे. आता त्याला माझी गरज नाही. मी आता त्याच्यापुढे तो येथून जाईपर्यंत जाणार, नाही आहे.

आधीचा देव बरा होताच या आपल्या प्रेमदात्रीला विसरला आणि निघून गेला, परंतु अरुण मात्र बरा झाला तरी राधामध्येच जिवाने गुंतला होता आणि त्याला तिचे प्रेम हवे होते. राधा यानंतर आपल्याला भेटणार नाही याचा अर्थच त्याला कळेना. तो कळवळला. राधाला भेटण्याचा हट्ट त्याने धरला. तो म्हणाला, नाही डॉक्टर, राधा भेटल्याशिवाय मी इथून जायचाच नाही. मी तोवर इथेच राहीन.

डॉक्टरांपुढे भयंकर पेच उभा राहीला. दाढीमिशात गंभीर दिसणारी त्यांची मुद्रा वास्तच गंभीर झाली.

कारण तरुण नर्स राधा एव्हांना इस्पितळाची पेशंट झाली होती. देव आणि अरुणला झाली तशी मानसिक व्याधी तिला या साऱ्या मनस्वी मानसिक ताणामुळे जडली होती आणि ती आता कोणाची नव्हती, तिची स्वतःचीही नव्हती.

असे या मूळ बंगाली, आता हिंदी 'खामोषी'चे कथानक. अॅक्यूट मॅनिया ही काय मानसिक व्याधी असते ते आपल्याला ठाऊक नाही. ते मानसिक उपचारांच्या तज्ज्ञांनाच ठाऊक. या व्याधीत नर्सला प्रेयसी बनावे लागते काय तेही त्यांनाच ठाऊक. पण या दोन्ही गोष्टी खऱ्या धरल्यास ही एक वेधक प्रेमकहाणी आहे यात शंका नाही. हिच्यात खऱ्या अर्थाने मनोविश्लेषण देखील—मानसिक उपचारांच्या इस्पितळातच ही घडत असल्याने—आहे. मानसिक चिकित्सा शास्त्राचा अपरिहार्य शास्त्रीय तपशील आणि एकाच जरा वेगळ्या प्रेमप्रकरणाचे अनेक प्रकारचे भावनिक ताण यांचा तोल किती आणि कसा राखला जातो आणि हे सर्व मिळून एक एकात्म चित्रपट तयार होतो की नाही यावर या कथानकाचा परिणाम अवलंबून होता.

या 'खामोषी' मध्ये भावनिक ताण व्यक्त करण्याची जबाबदारी सर्वस्वी नर्स राधा बनलेल्या वहिदा रेहमानवर आहे. अरुण झालेला राजेश खन्ना तिला साथ करतो. वहिदा ही तशी मोठी गुणी आणि समजदार नटी आहे. तिचे डोळे, तिचे ओठ तिच्या भुवयांमधली निसटती आठी किंवा तिच्या नाजूक नाकपुड्यांची पुसट स्पंदनेदेखील काही बोलत असतात, सांगत असतात. या 'खामोषी'मध्ये या बोलक्या आणि भावदर्शी मुद्रेचे पुरते चीज झालेले नाही. नेमकेपणाने या मुद्रेवरचे भावदर्शन पकडण्याऐवजी कॅमेऱ्याने या मुद्रेचे देखणेपण कायम धरून ठेवले आहे असे वाटते. अतिशय उत्कट पण दबलेल्या भावनिक संघर्षाच्या क्षणी कॅमेरा वहिदाच्या रूपाचे कॅलेंडरवरच्या चित्रासारखे देखणे दर्शन घडवीत राहतो आणि परिणामी या समजदार नटीचे अभिनय कौशल्य पडद्यावर पुरतेपणी उतरत नाही. यामुळे तिच्या भूमिकेतला भावनांचा तुंबळ संग्राम चित्रपटात बराच अव्यक्त राहतो; ढोबळपणे तो डोळ्यांखालची काळी वर्तुळे या किंवा असल्या रूढ युक्त्यांनी सुचवला जातो आणि अखेरचे राधाचे स्वतःच मानसिक व्याधीच्या आधीन होणे समजले तरी पटू शकत नाही. ती केवळ एक नाट्यपूर्ण कलाटणी उरते. आणि असल्या कलाटण्या देण्यात हिंदी चित्रपटवाल्यांचा हात कोणी धरू शकत नाही.

राजेश खन्ना हा समंजस नट आहे. परंतु वहिदासमोर तो कोवळा आणि नवखा वाटतो. जाडजूड कपडे घातल्यावरच तो 'हीरो' दिसतो, एरवी वहिदाचा धाकटा दीर नाहीतर भाऊ. त्याच्या पोरसवदा चेहऱ्यावर चित्रपटातल्या क्लोजअपमध्ये लागते त्या प्रकारचे भावदर्शन या चित्रपटात तरी घडत नाही.

या दोघांचे असे झाल्याने महत्त्व आले आहे संवादांना आणि ते या दोघांपुरते फार पुस्तकी, बोजड आहेत. त्यात सहजता, उत्स्फूर्तता नाही. एकादा गुंतागुंतीचा भावनिक ताण आणि त्यातली उलटसुलट स्पंदने व्यक्त करण्याची ताकद या संवादात नाही.

यातच इस्पितळाचे वातावरण अस्सल वाटत नाही. ललिता पवार चष्मा लावूनही सिस्टर वाटत नाहीत. नाझिर हुसेन हिंदी चित्रपटातले डॉक्टर वाटतात. पण एका खऱ्याखुऱ्या मानसिक उपचार केंद्रातले वरिष्ठ डॉक्टर वाटत नाहीत. पेशंटसचे नमुने अशा इस्पितळावरच्या एकाद्या हलक्याफुलक्या चित्रपटाची गरज भागविणारे आहेत. या 'खामोषी'साठी आवश्यक ती गंभीर आणि अनेक ताणांनी भरलेली वातावरणनिर्मिती ते करू शकत नाहीत. त्यामुळेच इस्पितळाच्या वातावरणाची मदत या चित्रपटातल्या मध्यवर्ती भावनात्मक संघर्षाला मुळीच झालेली नाही. एकादे वास्तवदर्शी, समस्यायुक्त नाटक गुंडाळणाऱ्या पड्द्यापुढे करावे तसा हा अस्सल कथाभाग एका तकलादू इस्पितळाच्या पार्श्वभूमीवर घडत जातो.

यात आला आहे विनोदमूर्ती अन्वर हुसेन. या चित्रपटात सर्वात सहजसुंदर, अकृत्रिम अभिनय करणारा हा एकच नट; त्याची दुय्यम तिय्यम व्यक्तिरेखाही या सहजगत्या घडणाऱ्या विनोदी वागण्याने लोभस बनली आहे परंतु ती कथेच्या गाभ्याला उपकारक तर नाहीच तर उलट या गाभ्याचा परिणाम जागोजाग उणा करणारी ठरली आहे. याच्या जोडीला गाणी आणि अर्धनग्न नृत्यांचा मसालाही आहेच.

परिणामी एक समर्थ कथा-कल्पना, बरेच पुस्तकी सुभाषितवजा संवाद, एक दोन सांकेतिक ठशाची श्रवणीय गाणी (संगीत-दिग्दर्शन निर्माते हेमंतकुमार यांचेच आहे; ) एक तकलादू वातावरण आणि अर्थात् वहीदा रेहमान – म्हणजे बव्हंशी तिचे केवळ सौंदर्यच – अशी या 'खामोषी'ची गोळाबेरीज झाली. यातून चांगला चित्रपट उभा राहिला नाही. जो उभा राहिला तो 'पब्लिक' मान्य ठरेल असेही वाटले नाही. जे काही दिसले ते अधले मधले आणि समाधानापेक्षा असमाधानच देणारे होते.

चित्रपट संपला. दादरच्या चित्रा सिनेमावरच्या 'मिनी' थिएटरमधून बाहेर पडून जिना उतरताना एकदम वाटले की खालच्या मजल्यावर धमाल गर्दीत चाललेल्या देव आनंदच्या 'प्रेम पुजारी'ला जाऊन बसलो असतो तर बरे झाले असते ! या अशा मनोविश्लेषणात्मक वगैरे 'खामोषी' नंतर रंगीत पोस्टरवरचा बंदूक हाती धरलेला वाकडी टोपीवाला डेंजरस देव आनंद भलताच 'फ्रेश' आणि हवासा वाटला. नवीन पिढीच्या भाषेत म्हणायचे तर, च्यामला त्यात ॲक्शन तरी आहे !

□ □ □

आझाद मैदान ........................ मुंबई

सोमैय्या पटांगण ................ श्रीरामपूर

# दोन टोके

शरद कृष्णन्

आझाद मैदान प्रेक्षकांनी फुलून गेले होते. इंदिरा काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनामध्ये यशवंतराव मोठ्या आवेशाने गर्जत होते—

" मावळत्या सूर्याची शपथ घेऊन सांगतो. समाजवाद आणल्याशिवाय स्वस्थ बसणे नाही "—मंडळी ऐकत होती. बाजूला उभा राहून मी गर्दी न्याहळत होतो. आइस्क्रीमच्या कांड्या चघळत, भेळीचे पुडे चिवडत जनता 'जुलूस'चा आनंद लुटत होती.

नेता बोलत होता—"इंदिराजी या वाटेवरून माघारी फिरल्या तरी आम्ही हटणार नाही. अखेरच्या पर्वाला सुरुवात झाली आहे. दोर छाटून टाकले आहेत. आता माघारी जाणे नाही. ध्येयपूर्तीखेरीज स्वस्थता नाही. "—टाळ्या, प्रचंड टाळ्या. नेत्यांमागून नेते बोलत होते. समाजवादाचा उद्घोष होत होता. अवाढव्य मंडप, आकर्षक रोषणाई, प्रशस्त व्यासपीठ, स्वच्छ खादी—परीटघडीतील राजस नेतृत्व, 'समाजवाद' समजावत होते. जनता ऐकत होती.

आज मी श्रीरामपूरमध्ये भूमिहीन शेतमजूर आणि गरीब शेतकरी यांच्या अधिवेशनासाठी आलो होतो. अन्नाला मोताद झालेला, दारिद्र्याने पिचून—खचून गेलेला, उपासमारीला जीवन मानून आले जीवन जगणारा एक वेगळा समाज मी पाहत होतो आणि मुंबई अधिवेशन, ते नेते, त्या नाटकी घोषणा, तेथील तो वेगळा समाज, माझ्या डोळ्यांसमोर पुन्हापुन्हा येत होता. [ पृष्ठ ४९ वर ]

# दोन जगे

मुक्ताफळे

# कामरेड अरुणा पिवळी झाली



मरहूम देशभक्त बॅ. असफअल्ली यांच्या हिंदू पत्नी अरुणा असफअल्ली, या पतिनिधनानंतर लवकरच सुस्थळी पडल्या. त्यांचे मॉस्कोशी जमले. कॉमरेड अरुणाताई हातोहात लाखोपती कशा झाल्या ही सुरस आणि चमत्कारीक कथा आहे. राजधानीतून प्रसिद्ध होणाऱ्या 'लिंक' आणि 'पेट्रियट' या दोन वृत्तपत्रांच्या व्यवहारात या बाईंनी १७ लाख रुपये भांडवल म्हणून गुंतवलेले आहेत. या सड्या बाईजवळ हा एवढा पैसा कसा खडा झाला, यासंबंधी राज्यसभेत प्रश्न विचारण्यात आला. या पेट्रियटबाईची लिंक कुणाशी आहे, याचा छडा लावण्याचा हा प्रयत्न होता. अर्थखात्याचा कब्जा केलेले रघुपती खाडिलकर, यांनी यावर थोडासा खुलासा केला.

त्याचे म्हणणे असे झाले.

भारत-पाक युद्ध सुरू होताच भारत सरकारला पैशाने पेचात धरले. परदेशातून इथे पैसे पाठवण्यास उत्तेजन देण्यासाठी सरकारने घाईघाईने एक सवलत जाहीर केली. सवलत अशी होती, की परदेशांतून जी रक्कम भारतात येईल त्यातल्या ६० टक्के रकमेचे आयात परवाने भारत सरकार देईल.

सवलत जाहीर होताच अरुणाबाईंच्या मित्राने त्यांना सात लाख, पंचाण्णव हजार, पाचशे चव्वेचाळीस रुपये पाठवले! भाऊबीज यावी तसे पैसे आले. याच्या ६० टक्के रकमेचे म्हणजे चार लाख एक्याऐंशी हजार रुपये किंमतीचे आयात परवाने भारत सरकारने बाईंना दिले.

अरुणाबाईंची झाली पंचाईत. भूपेश गुप्तांना त्या म्हणाल्या—"अहो, या पैशांचं करायच तरी काय बाई? मा मिंक कोट घेऊ का?" भूपेश गुप्तांनी बाईंच्या कानात काहीतरी सांगितले. तेव्हा भान न राहून बाई मोठ्याने म्हणाल्या—"अहो, म्हणजे काय काळाबाजार करायचा?" सगळे कॉमरेड म्हणाले—"समाजवादी क्रांतीसाठी आपण काय वाटेल ते करू!"

मग सगळेच व्यापारी करतात ते अरुणाबाईंनी केले. आयात परवाने काळ्या बाजारात टाकले विकून. चार लाखांचे फटकन सोळा लाख आले. दिल्लीहून 'लिंक' आणि 'पेट्रियट' ही समर्थांघरची दोन वृत्तपत्रे दणक्यात सुरू झाली.

देवाजीने करुणा केली तर भाते पिकून पिवळी होतात. तरीसुद्धा भात कापावे

लागते, दाणे वेगळे काढावे लागतात. मळणी करा, पोती भरा. कमी का व्याप असतो! परंतु कोसिजिनने करुणा केली! कॉमरेड अरुणा पिवळी झाली. अगदी डायरेक्ट. ही सुरस कहाणी तुम्हा आम्हांला सुरूळ कशी व्हायची हा आमच्यापुढे प्रश्न होता.

प्रश्न होता असे आम्ही म्हटले कारण आता तोही प्रश्न उरलेला नाही! करुणानिधी कोसिजीन यांनी भारतात सर्व भाषांत चालवलेल्या 'सोविएट देश' या नियतकालिकाने, वर्गणीदारांना जी नवी सवलत योजना जाहीर केली आहे, ती वाचल्यानंतर आमची खात्री झाली की भारताचे पंतप्रधान म्हणून कोसिजीन व उपपंतप्रधान म्हणून अमेरिकेचा अध्यक्ष पोसिजिन यांची संसदेने एकमुखाने निवड केल्यास भारतापुढे कसला म्हणता कसला प्रश्न म्हणून राहणार नाही.

आता 'सोविएट देश' हे नियतकालिक ज्यांनी पाहिले असेल, त्यांना हे माहीत आहे की पुस्तकांना वेष्टने घालण्यासाठी, इतका उत्तम कागद सध्या भारतात उपलब्ध नाही. या दृष्टीने या नियतकालिकाचे महत्त्व सर्वांनाच मान्य होण्यासारखे आहे. असे नियतकालिक कोसिजीन किती बरे स्वस्त देतो? तीन वर्षांची वर्गणी रुपये दहा फक्त. बक्षीस म्हणून एक सुंदर रंगीत चित्रांचे कॅलेंडर आणि शिवाय एक रोजनिशी. परंतु ही स्वस्ताई तर दरवर्षीची आहे. यंदा शिवाय 'सोविएट देश' लॉटरी लागलेली आहे.

रॉयल एन्फिल्ड मोटार सायकल, राजदूत गाडी, ऑल्विनचा रेफ्रिजरेटर, गोदरेजचा फ्रिज, फीलिप्सचा रेडिओग्रॅम, रशियन कॅमेरे, रशियन ट्रान्झिस्टर, रशियन सायकली, घड्याळे, टेबल फॅन, प्रेशर कुकर, सुटकेसेस, अशी शेकडो बक्षिसे या लॉटरीत ठेवलेली आहेत.

आपला देश दळिद्री आहे. पण इथल्या लोकांना लॉटरी खूप आवडते. इथली सरकारे लॉटऱ्या खेळतात, समाजातले विचारवंत समजले जाणारे, न्यायाधीश, साहित्यिक हे लॉटरीची तिकिटे काढायला वेळात वेळ काढून जातात, या गोष्टी कोसिजीन साहेबांच्या कानावर गेल्याबरोबर, त्यांनी 'सोविएट देश'चीही लॉटरी सुरू केली. या लॉटरीला तिकिटदेखील ठेवलेले नाही. फक्त 'सोविएत देश'चे वर्गणीदार झाले की झाले. तुमचा वर्गणीदार क्रमांक नशिबाने लागला तर दारात रॉयल एन्फिल्ड उभी राहील!

धन्य ती करुणा. धन्य ती अरुणा.

धन्य तो कोसिजीन आणि धन्य आपण हीन-दीन!

—ग्यानबा

मौजे गांधीनगर

श्री. ज. जोशी


# समाजवादाची रात्र आहे

सुमारे शंभर वर्षांपूर्वी मालाकार चिपळूणकरांनी निबंधमालेत 'आमच्या देशाची स्थिति' हा निबंध लिहिला. त्या वेळी देश पारतंत्र्यात होता. राष्ट्रीय चळवळीला नुकती कुठे सुरुवात झाली होती. जनता लाचार, अशिक्षित आणि स्वार्थपरायण होती. त्या लेखात शास्त्रीबोवांनी हिंदी जनतेबद्दल काही मूलगामी विचार मोठ्या तळमळीने व्यक्त केले होते.

मी अहमदाबादहून मुंबईकडे निघालो तेव्हा एकोणीसशे सत्तर साल उगवायला थोडा अवधी होता. स्वातंत्र्य मिळून दोन तपे होत आली होती. तथाकथित तीन पंचवर्षीय योजना पार पडल्या होत्या. भाषावार प्रांतरचना झाली होती. प्रत्येक प्रांताला राज्यपाल, मंत्रिमंडळे, सभागृहे, इत्यादी सरंजाम मिळाला होता. कोट्यवधी रुपये खर्च होत होते. पण अजूनही 'आमच्या देशाची स्थिती' तशीच होती— किंबहुना जास्त बिघडली होती. अहमदाबाद सोडायच्या दिवशी मुंबईकडे जाणाऱ्या गाडीची वाट पाहत मी नि पारगावकर सकाळच्या वेळी फलाटावर बसलो होतो. घाणेरडे मळीन कपडे घातलेले, मलमूत्रादी विधी बिनदिक्कतपणे कोठेही करणारे, अशिक्षित, संस्कृतिहीन आणि लाचार असे आमचे नाना प्रांतांतले देशबांधव गाड्यांसाठी गर्दी करून उभे होते. त्यांच्याकडे बघावे असेही वाटत नव्हते. स्वातंत्र्याचे वारे पंचवीस वर्षे खाल्लेली जनता, खरे सांगायचे म्हणजे फारच केविलवाणी दिसत होती. सगळीकडे घाणच घाण होती....शेणकिड्यांसारखी माणसे वळवळत होती.

त्या जनतेकडे फार वेळ बघत बसणे अशक्य होते. मी तिच्यातलाच होतो पण तरीही मनात कुठेतरी निराळा होतो. त्या जनतेकडे पाहताना मी जणू माझ्याकडेच पाहत होतो....मला मीच घाणेरडा वाटत होतो. मी डोळे मिटून घेतले आणि बाकावर स्वस्थ बसून राहिलो.

लेखांक सात



| | | | |

# जागा राहा.!...!...

आदल्या दिवशी सर्व दिवसभर अहमदाबादेत हिंडायचे आणि निरनिराळ्या थरांतील लोकांच्या मुलाखती घ्यायच्या असे ठरले होते. पण ते विशेष जमलेच नव्हते. हल्ली कोणतेही शहर सारखेच असते....बस स्टँड...डांबरी रस्ते...अनेक मजली इमारती...उद्याने !...फरक असा काहीच नसतो. हॉटेलांतल्या चहाची चव तीच असते. इतकेच काय, खानावळींची नावेही तीच असतात. पुण्यास सोन्या मारुतीजवळ 'चेतना' हॉटेल आहे आणि स्टेशनजवळ 'ड्रीम-लँड' आहे. अहमदाबादेतही चेतना आणि ड्रीमलँड आहेतच. एका रात्री आम्ही चेतनात जेवत होतो तेव्हा मला सारखा भास होत होता की रस्त्यावर खाली उतरायचे, थोडे चालल्यावर सिटी पोस्ट येणार, तिथे चौदा नंबरची बस धरली की थेट डेक्कन जिमखाना! ...पुण्यापेक्षा अहमदाबाद जास्त स्वच्छ वाटले हे खरे. पण कदाचित् आम्ही ज्या भागातून हिंडत होतो, तोच भाग स्वच्छ असेल. कसबा पेठ आणि नाना पेठ तिथेही असणारच. शहरात हिंडून प्रेक्षणीय स्थळे पाहण्याचा उल्हास त्यामुळे नव्हताच...मुलाखतींचेही तसेच. कोणताही माणूस काय बोलणार हे कळत असतेच. आपल्या विचाराला पोषक अशाच मुलाखती वर्तमानपत्री लेखक घेत असतो. एका दृष्टीने हे पक्षपातीपणाचे आहे. आपले विचार हेच बरोबर आणि इतरांचे चूक, असे माणूस समजत असतो. जगात संपूर्ण सत्य कधी कुणाला कळते की नाही कुणास ठाऊक ! पण मुलाखत्याला मात्र ते सत्य कळत नाही हे निश्चित. मुलाखती घेण्याचा माझा उत्साह म्हणूनच हल्ली मावळत चालला आहे.

फलाटावरच्या बाकावर डोळे मिटून बसलो असताना आदल्या दिवशी घेतलेल्या दोन तीन मुलाखतींतली काही विधाने मात्र मनात आतल्या आत घोळत होती. पायाखालची वाळू सरकल्यासारखी वाटत होती. पुन्हा पुन्हा शब्द आठवत होते.

एलिसब्रिजच्या पलीकडे एका प्रशस्त बंगलीत एक आय. ए. एस. अधिकारी

राहतो. अहमदाबादच्या दंगलीच्या वेळी तो तिथेच होता. त्याला भेटायला गेलो असताना तो म्हणाला, " हिंदू आणि मुसलमान यांचा प्रश्न कधीही सुटणार नाही. ...परवाच्या दंगलीत वर्तमानपत्रांत जाहीर झालेल्या मृतांच्या आकड्यांपेक्षा कितीतरी अधिक पट लोक मेले आहेत....सुऱ्याने भोसकून मारलेले मी समजू शकतो. परंतु आठ-आठ दहा-दहा माणसे मारल्यावर त्यांना एकत्र करून रस्त्याच्या मध्यभागी पेट्रोल ओतून जाळून टाकायचे आणि मुले-बाळे असलेल्या संसारी लोकांनी ती आग शांतपणे बघत बसायचे हे मी समजूच शकत नाही. "

मी त्यांना विचारले होते, " माणसं जाळायची कशासाठी ?"

" जाळल्यानं सबंध पुरावा नष्ट होतो हे तर खरंच; परंतु दंगेखोर आता एक नवीनच तत्त्व शिकले आहेत. घरंदारं किंवा प्रार्थना मंदिरं जाळली – त्यांचा विध्वंस केला तर दंगा संपल्यानंतर काँग्रेस सरकार मतांच्या आशेनं ती प्रार्थनास्थानं जास्त भव्य प्रमाणात बांधून देतं. त्यामुळं मूळ हेतूच सिद्ध होत नाही. परंतु माणसं जाळून टाकल्यावर सरकार मतांसाठीही नवा माणूस निर्माण करू शकत नाही. माणस गेला की गेलाच ! "

तो आय. ए. एस. अधिकारी बहुतेक सर्व मध्यमवर्गीयांप्रमाणे ' सिनिक ' होता. त्याला कोणत्याच गोष्टींबद्दल आदर नव्हता. संभाषणाच्या ओघात तो म्हणाला होता, " इंदिरा गांधींनी जवाहरलाल नेहरूंची राजनीती पूर्णपणे उचललेली नाही. देशात कोणतंही अंतर्गत संकट येवो,...रुपयाचं अवमूल्यन होवो...अवर्षणामुळं दुष्काळाचा धोका उत्पन्न होवो...किंवा लाल त्रिकोणाला न जुमानता लोकांना चार मुले होवोत. पंडित नेहरूंचं एक ठरलेलं असे. ते अशा वेळी हिंदु-मुस्लिम एकीचा उच्चरवानं घोष करीत आणि हिंदु समाजाला शिव्यांची लाखोली वाहत. हिंदू समाज कुंभाराच्या गाढवासारखा असल्यामुळं त्याच्या पाठीत कितीही दांडकी हाणली तरीही चालतं हे नेहरूंना माहीत होतं. हिंदु-मुस्लिम ऐक्याची बांग दिली की इतर सर्व प्रश्न मागं पडतात हे त्यांनी ओळखलं होतं. इंदिराजींना ते कसं माहीत नाही ?...सध्या त्यांचा बिकट काळ आहे. अशा वेळी हिंदू समाजाला शिव्या त्या कशा देत नाहीत हे मला कोडं पडलं आहे. "

अहमदाबादेत दोन-तीन पिढ्या घालवलेल्या एका महाराष्ट्रीय शाळामास्तराने सांगितले, " पूर्वी अहमदाबाद चांगलं होतं. महाराष्ट्रीय म्हणून आम्हांला काहीही त्रास नव्हता. परंतु शिवसेनेची चळवळ तिकडे फोफावल्यावर गुजराथी माणसाच्या मनात आमच्याविषयी दूरता निर्माण झाली असे दिसते....तो व्यापारी समाज असल्याकारणानं बाह्यत: कोठेच काही दिसणार नाही....पण मनात एक अढी आहे हे निश्चित..."

त्या माणसाची दोन्ही मुले पुण्या-मुंबईकडे नोकरीला असल्याचे ऐकून आम्ही

[ पृष्ठ ४३ वर ]

# मुक्काम चंदीगड

सरतेशेवटी चंदीगडला, पाच वर्षांनी का होईना, पंजाबातच घालण्याचे ठरले. खरेतर हा निर्णयच मुळी राजकीय स्वरूपाचा आहे. तो घेण्यामागे कुठल्याही तत्त्वचिंतनाचा अगर विचारसरणीचा तोंडदेखलाही आधार फेकण्याची जरुरी, हा निर्णय घेणाऱ्यांना भासली नाही. हरियानात सुरुवाती–सुरुवातीला दंगल झालीच. पंजाब अर्थातच शांत होते, निकाल विरुद्ध लागला नाही म्हणून. उलट चंदीगड शांत राहिले. कारण कुठच्याच निर्णयाची कुणाला फारशी तमा नव्हती. विद्यापीठाच्या आवारात फत्तेसिंहांचा पुतळा (एकदा) जाळण्यापलीकडे कसलेही जाहीर मतप्रदर्शन कुठेही झाले नाही. जनताजनार्दनाचे हे औदासिन्यच मध्यवर्ती सरकारच्या पथ्यावर सतत पडत आले आहे.

शहा कमिशन हा राजकीय स्टंट मुळीच नव्हता. पूर्वग्रहांचा उपसर्ग अजिबात होऊ न देता फक्त बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोनांतून राज्यपुर्नरचनेची उकल सोडवण्याचा तो एक नंतर केविलवाणा ठरलेला असा प्रयत्न होता. अंबाल्यातील 'खर्डे' तालुक्यातील ज्या वीसएक गावांचा मोहरा बदलून चंदीगडची निर्मिती झाली तेथील बोली भाषा काही पंजाबी शब्दांना जवळ घेऊन वावरणारी हिंदी भाषाच होती. म्हणजे भौगोलिक आणि भाषिक दृष्ट्या चंदीगडवरील पंजाबचा हक्क बाद ठरतो. हरियाणाची वकिली करण्याचा जरी मानस नसला तरी चंदीगडात उघड्या डोळ्यांनी वावरणाऱ्या कुणाही तिऱ्हाइताला वरील बाबी मान्य व्हाव्यात. मुळात हा सर्व वाद एका वेगळ्याच पातळीवरती लढला गेला; जणू दोन मल्लांमध्ये चाललेली कुस्तीच. आणि त्यात विजयाची माळ पंजाबच्या गळ्यात पडली पण अतिसामान्य दादागिरीही सुसह्य व्हावी इतक्या आक्रस्ताळेपणाने उपोषणाचा मार्ग दोन्ही पक्षांकडून हाताळला गेला. उदाहरणार्थ, फत्तेसिंहाची राजकीय–वैचारिक बैठक. हिचे महात्मा गांधींच्या उपोषणासंबंधींच्या सिद्धांताशी प्रमाण–हा मुद्दा बाजूस ठेवूनही ह्या मतलबी सोंगाडेपणाकडे बोट दाखवावेसे वाटते. त्याचे कारण न्याय्य हक्कांचे पाठबळ नसतानाही हौतात्म्याचे वलय निर्माण होणे सवंग ठरू पाहत आहे.

हरियानाच्या ह्या राजकीय पराभवाचं मूळ तेथील दिवाळखोर नेतृत्वात सापडेल. निव्वळ भगवत दयालांच्या 'शर्मा–छाप' नेतेपदाला 'खो' घालण्याचे कंकण बांधलेल्या 'जाट' ह्या बहुसंख्य जमातीच्या काही अडाणी अन् तथाकथित प्रथितयश पुढाऱ्यांच्या हातात सत्ता गेल्यापासून अगोदरच मोडकळीस आलेल्या राज्ययंत्रणेचे तीन–तेरा वाजले. अखिल भारतीय पातळीवर तर सोडाच, पण हरियानातही किमान परिणामकारक ठरेल असा कुणी नेताच कधी झाला नाही.

गुरनामसिंह हा सन्माननीय अपवाद वगळता थोड्याफार फरकाने पंजाबातही हीच परिस्थिती आहे. पण अकाली–जनसंघी काय अगर काँग्रेसवाले काय आपापल्या–परीने त्या संघटना म्हणूनच मूळ धरून आहेत आणि त्यांनीच एकमुखाने आवाज-पण उठविला. ह्याउलट निव्वळ सौदेगिरीच्या जिवावर वेगवेगळ्या लाटांवर आरूढ होणारे आणि तरंगत–तरंगतच वर खाली होणारे राव विरेन्दर सिंह काय किंवा बंसीलाल–देवीलाल–हरद्वारीलाल काय ही सर्वच जत्रा अप्रगल्भ आणि म्हणूनच फिकी ठरली. हरियानावर झालेल्या अन्यायात (?) यांचा वाटा सिंहाचाच आहे. दिल्ली दरबारला फक्त कातडी वाचवायची होती आणि तीही कामगिरी नेहमी-च्याच चलाखीने पार पाडली गेली. आरडाओरडा अन् धाकदपटशाच्या ह्या गदारोळात एका शास्त्रीय तत्त्वाकडे सोयीस्करपणे आणि जाणूनबुजून दुर्लक्ष केले गेले हे नाकारण्यात अर्थ नाही.

इतरांचे जाऊच द्या पण महाराष्ट्रातीलच काही ख्यातनाम नेत्यांनी केन्द्र-सरकारच्या चंदीगडसंबंधीच्या निर्णयाचं दिलखुलास स्वागत केलंय्. काही उच्चभ्रू वृत्तपत्रांनी तर संभाव्य चळवळींवर टीका करून हरियानालाच सामोपचाराचा उपदेश केलाय्. सर्वात कळस म्हणजे तोच न्याय बेळगावला लावण्यासंबंधी केंद्र-सरकारला आवाहन केलंय्. उद्या 'पाटसकर फॉर्म्युला' अमलात आणायचे ठरलेच तर चंदीगडसंबंधीचा निर्णय १८० अंशांनी फिरवावा लागेल हे लक्षात घ्यायचीही कुणाची तयारी नाही. आणि तेही शहा कमिशनचा इतिहास इतका ताजा असताना. मुंबईसाठी महाराष्ट्र एकटेपणानेच लढला; परप्रांतीयांच्याकडून काही वेळेला करण्यात आलेल्या सबूरीच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून लढला. एरवी मुंबई पाच हजार वर्षे केन्द्रशासितच राहणार होती की!!! चंदीगडवरच्या हक्काचाच प्रश्न घसाला लागला म्हणून हे तरी विस्ताराने सांगावे लागले. नाहीपेक्षा त्या 'बफर' प्रदेशावर असलीच कुणाची तर फक्त केन्द्राचीच अधिसत्ता असू शकेल हे एक न रुचणारे सत्य आहे.

हरियाना पेटणार आहे असे सूर कानात आदळताहेत. पण तेही शेवटी चहाच्या पेल्यातीलच वादळ ठरण्याची शक्यता अधिक. आपापसातील हेवेदावे, परस्पर-विरोधी उद्दिष्टे आणि बोगस राजकीय मतभिन्नतेने पोखरलेले हरियानामधील समाजचित्र एक प्रकारच्या तकलादू स्थैर्यानेच राहिलं तर राहील लडबडलेले. चंदीगड मिळविण्यात आलेल्या ह्या अपेक्षित अपयशापेक्षाही एकूणच भवितव्या-विषयीची ही अंधकारमय अनिश्चितता खेदजनक आहे.

**– सौ. निलान् जोशी**

किरण ठाकूर

# बंडखोर विचाराग्रणी रसेल

बरट्रँड रसेल गेले. आणि अठ्ठ्याण्णव वर्षांच्या झपाटलेल्या इतिहासाचे पुस्तक मिटले गेले. या धगधगत्या जीवनाने शांततेचा निष्ठापूर्वक प्रचार केला, गणितामध्ये मौलिक भर घातली, तत्त्वज्ञानाला नवे वळण दिले, परंपरागत समजुती कोलमडून टाकल्या, लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करुन सुधारक म्हणविणाऱ्यांनाही तोंडात बोटे घालायला लावली. जीवनातील प्रत्येक अंगाला स्पर्श करुन त्याने ते कुठल्या ना कुठल्या अर्थाने व प्रकाराने उजळून टाकले.

रसेल गेले, त्यांच्याविषयी खूप ऐकून होतो. वर्तमानपत्रांतून मृत्युलेख वाचले आणि औत्सुक्य चाळवले गेले.

आज त्यांचे चरित्र वाचतो आहे. एकच माणूस इतक्या अनेक भूमिका नाटकात करु शकेल, पण वास्तवात त्या जगणे केवळ रसेललाच जमावे. मृत्यूनंतर कौतुक सर्वांचेच होते. तो महान कसा होता हे पटवून देण्यात अहमहमिका लागलेली असते; पण बरट्रँडच्या बाबतीत काही सांगायला नको, पटवायला नको.

रसेल गणिती, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ होते पण त्याहीपेक्षा ते थोर बंडखोर होते, म्हणून मला त्यांचे जीवन लोभावते.

तत्त्वज्ञाला व शास्त्रज्ञाला आवश्यक असलेली चौकस बुद्धी बाहेरुन मेंदूत शिरत नाही. ती मुळातच असावी लागते. लहानग्या 'बर्टी'त व त्याच्याबरोबरीच्या मुलांत एकच मोठा फरक होता. तो म्हणजे इतर पोरे मोठ्यांनी सांगितलेल्या गोष्टींवर बिनतक्रार विश्वास ठेवत, तर पडताळा पाहिल्याशिवाय हा काहीही मानण्यास तयार नसे. पाच वर्षांचा असताना त्याला कोणीतरी सांगितले, पृथ्वी गोल आहे. असं काय, मग बर्टीने बागेतली जमीन उकरायला सुरुवात केली—पृथ्वी गोल असली तर ऑस्ट्रेलियात पोचलो पाहिजे–! याच सुमारास आत्येने सांगितले,

लहान मुलं झोपतात ना तेव्हा त्यांच्या शेजारी देवदूत येऊन बसतात. "मग मला ते का दिसत नाहीत?" तू डोळे उघडतोस म्हणून ते निघून जातात. "ठीक आहे." बर्टीने डोळे मिटतेच ठेवले आणि शेजारी चाचपडून पाहिले!

सनातनी अंधश्रद्धेवर विश्वास ठेवण्यास तो पहिल्यापासून नाखूष होता. सत्य आणि बुद्धिप्रामाण्य यांवर त्याचा विश्वास. त्यामुळे प्रथमपासूनच तो अप्रिय आणि पुढे वादग्रस्त बनत चालला.

त्याच्या अफाट बुद्धिसामर्थ्यापेक्षाही मोहिनी पडावी ती माणसाविषयी त्याला असलेल्या प्रेमाची, जीवनाविषयी असलेल्या ओढीची.

रसेलची मते लवचिक असत. कारण तो प्रखर बुद्धिवादी होता. तसंच जास्त समंजसही होता. त्याने मांडलेल्या कोणत्याही विषयावरची मते त्याच्याच आधीच्या विधानांशी असुसंगत असलेली पाहायला मिळतात, कारण तो नुसताच बुद्धिनिष्ठ नव्हता तर त्याचं शहाणपण अनुभवजन्य होतं. आधी कम्युनिस्टांशी हाडवैर असल्यागत वागणारा रसेल नंतर रशिया—चीनची तरफदारी करताना पाहायला मिळतो किंवा पहिल्या महायुद्धाला विरोध करणारा बरट्रँड दुसऱ्या महायुद्धाची सयुक्तिकता पटवताना दिसतो त्यात यामुळेच आश्चर्य वाटू नये. तुम्हाला त्याचे आधीचे वा नंतरचे कोणतेही मत न पटो; पण त्याच्या मतांच्या बुडाशी बुद्धी व तत्त्व यांचा प्रखर निकष त्याने लावलेला आहे हे कोणी नाकारू शकणार नाही.

चरित्राची काही पानं उलगडल्यानंतर तुम्ही येता पहिल्या महायुद्धाच्या वेळच्या बरट्रँडकडे. ख्रिश्चन धर्मातील दांभिकपणाविषयी त्याचा कडवटपणा निर्माण करणारा प्रसंग असा. दारूच्या नशेत एका कामगाराने रसेलच्या भांडखोर, तिरसट शेजाऱ्याला शिवी दिली आहे, शेजाऱ्याने कोर्टात दावा लावून कामगाराला दंड करविला आहे. दंडाची रक्कम, बायकोचे बाळंतपण यामुळे कामगार रडकुंडीला आला आहे, रसेल समजूत घालण्यासाठी शेजाऱ्याला भेटायला चर्चमध्ये गेला आहे. शेजारी म्हणतो, "पाप्याला शासन झालंच पाहिजे." चर्चच्या पायऱ्या उतरता उतरता रसेल चुकल्या मेंढराला कळपात घेणाऱ्या ख्रिस्ताच्या या भक्ताकडे पाहून विषण्णतेने हसत निघून गेला आहे, कामगाराच्या दंडाची रक्कम स्वतः भरून त्याला मुक्त केले आहे...प्रसंग पूर्ण होतो आणि तुम्ही विचार करता, या काळात रसेल कम्युनिझमच्या विरोधी होता असं टीकाकार का बरं म्हणतात?

स्त्री-स्वातंत्र्याचा कैवार घेऊन त्याचा हिरीरीने पुरस्कार करणारा रसेलही पुढे आपल्या पाहण्यात येतो. आपल्या देशातील स्त्रियांना समान हक्क, स्वातंत्र्य सहज मिळाले असले तरी साहेबाच्या देशात त्यांना दीर्घकाळ भांडत बसावे लागले. 'स्त्री स्वातंत्र्यं न अर्हती' मानणाऱ्या मनूचे अनेक अवतार प्रागतिक इंग्लंडमध्येही होते ही गोष्ट अजब असली तरी ती वस्तुस्थिती आहे. रसेलने स्त्रियांना पूर्ण मतस्वातंत्र्य मिळावे म्हणून आत्यंतिक टोकाला जाऊन लढा दिला. इतर बाबींमुळे

–विशेषत: शांततावादी विद्वान असल्याने–त्याला लोकप्रियता असूनसुद्धा केवळ याच कारणामुळे तो निवडणुकीत आपटी खात गेला.

राजकारणाविषयीचे–विशेषत: लोकशाहीविषयीचे त्याचे ज्ञान, दूरदृष्टी व अंदाज अतिशय अचूक ठरत गेले. वेळोवेळी तो राज्यकर्त्यांना धोक्याच्या सूचना देत राहिला. आपले मागचे विचार चुकीचे आहेत असे वाटले की लगेच त्यात बदल करीत राहिला. त्यामुळे त्याला आधी आक्रस्ताळी कोल्हा म्हणणाऱ्या रशियाला तो कम्युनिझमच्या बाजूने झुकला तेव्हा काय म्हणावे हे उमजेना.

झोंबणारा विनोद हे त्याच्या स्वभावाचे मोठे वैशिष्टच. विनोदबुद्धी असलेल्या खिलाडू व्यक्तीला तो नक्कीच आवडे. पण तिचा अभाव असलेला माणूस त्याचा तिरस्कार करू लागे. लोकशाहीमध्ये चांगला भाग कोणता असा प्रश्न केला असता तो म्हणाला, " हा, त्यात एक चांगले असते. मतदारापेक्षा उमेदवार जास्त मूर्ख असून चालत नाही. कारण तो जितका जास्त मूर्ख त्याहून त्याला निवडून देणारे मतदार अधिक मूर्ख ठरत जातात. "

लैंगिक स्वातंत्र्याविषयींच्या त्याच्या कल्पनांमळे रसेल जास्तीत जास्त वादग्रस्त बनत गेला. लग्न केले म्हणून पुरुषांनी किंवा स्त्रियांनी बाहेर संबंध ठेवू नये, हे परंपरेने चालत आलेले बंधन त्याला साफ नामंजूर होते. घटस्फोटासाठी बाहेरख्यालीपणा हे कारण त्याला पटत नव्हते. लहान मुलांना लैंगिक शिक्षण द्यावे, त्यांच्यावर कसलेही बंधन असू नये अशी मते त्याने आपल्या लिखाणातून मांडली आणि नुसत्या इंग्लंडमध्येच नाही तर सबंध जगभर खळबळ माजली. वास्तविक त्याने इतर क्षेत्रातही एवढी आमूलाग्र क्रांती घडवून आणली. पण तो इंग्लंडबाहेर अनेकांच्या लक्षात राहिला लैंगिक स्वैराचाराचा पुरस्कर्ता म्हणूनच. त्याच्या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त अमेरिकेतील टेलिव्हिजन कंपनीने मुलाखत घेतलेली फिल्म तिकडे नेली तेव्हा न्यूयॉर्क विमानतळावरचा कस्टम अधिकारी जीभ चाटत म्हणाला, " रसेल ? म्हणजे सेक्सवाला अं ? मग ती फिल्म सेन्सार करायलाच पाहिजे. "

पंतोजी शिकवितात ती पद्धत पूर्णत: चुकीची आहे, मुलांना हवे तसे वागू द्या, त्यांच्यावर जबरदस्ती करू नका, त्यांच्या आवडीचेच तेवढे शिकवा, असे तो म्हणत असे. या तत्त्वांवर त्याने एक शाळाही काढली. तिथे मुलांवर कुठलेही बंधन नव्हते. कदाचित आपल्या म्हणण्याची सत्यता पटविण्याच्या या प्रयत्नात त्याला यश मिळाले असते. पण शाळा चालविताना येणाऱ्या व्यावहारिक प्रश्नांनी त्याला हतबल करून टाकले. पण त्यामुळे टीकाकारांना त्याची टर उडवायला चांगली संधी मिळाली. अनेक दंतकथा प्रसृत झाल्या. त्यापैकी एक मोठी गंमतीशीर आहे. एक गृहस्थ या शाळेत आले तेव्हा एका पोरटीने दार उघडले. तिच्या अंगावर अजिबात कपडे नसल्याचे पाहून तो पुटपुटला, " अरे देवा ! " पोरीने चुकचूक केले

आणि दार लावून घेत म्हणाली, " देव ? कुठला आलाय देव ?"

प्रखर बुद्धिमत्ता असलेला रसेल आरंभी अगदी लाजाळू होता. सभेत बोलताना भांबावून जायचा. त्याचे मित्र त्याला अक्षरश: बखोटीस मारून स्टेजवर नेत. सभेवरही त्याची आरंभी छाप पडत नसे. शांतपणे एका स्वरात तो बोलत राही. पण पुढेपुढे त्याच्या प्रक्षोभक विचारांनी त्याच्या भाषणांना होणारी गर्दी वाढत गेली. सभेसाठी लोक तिष्ठत बसत. रेडिओ, टेलिव्हिजन, सभा व वृत्तपत्रांतील लेखन यावरच त्याची उपजीविका चालत होती. भाषणापेक्षाही त्याचे लिखाण जबरदस्त होते. १९३० सालच्या एका मुलाखतीत तो म्हणतो, " दिवसात मी साठ हजार शब्द लिहितो, एकदा लिहिलेला मजकुर पुन: दुरुस्त करणे मला आवडत नाही. " लिहित असताना भोवताली काय घडते आहे याचे त्याला भान रहात नसे. मुले खेळत असली, कानाभोवती भुंगा गुणगुणत असला तरी या गृहस्थाची एकाग्रता ढळत नसे. पण इतरांच्या बोलण्यात त्याचा उल्लेख आला की मग मात्र हा टवकारून पहायचा. जेवणासाठी बोलावले की आहे त्या शब्दापाशी थांबून उठून जायचा आणि ते आटोपून आला की त्या शब्दापासून पुन: लिहायला लागायचा. याचे कारण त्याच्या डोक्यातील विचार आधीच स्पष्ट होऊन गेलेले असत, ते फक्त कागदावर उतरविणे एवढेच नंतर काम असे. त्यामुळे प्रकाशकाला दिलेल्या तारखेच्या फक्त वीस दिवसच आधी तो पुस्तकाचे काम सुरू करून संपवू शके. साधे बोलताना देखील तो विचारपूर्वक वाक्याचा शेवट ठरवून सुरुवात करी.

विचारांच्या स्पष्टतेचे कारण आपले निद्रिस्त मन आहे असे तो सांगे. एखाद्या विषयावर विचार करायला आपल्या मनाला तो सांगे आणि नंतर त्याविषयी पूर्णपणे विसरून जाई. तत्त्वचिंतनाचे किचकट काम हे निद्रिस्त मन कित्येक दिवस करीत राही आणि अचानक साक्षात्कार झाल्यागत त्याच्या तोंडून अथवा लेखणीमधून नवे तत्त्वज्ञान बाहेर पडे. सुप्त मन ही त्याला मिळालेली दैवी देणगी होती.

तत्त्वज्ञानी गणितज्ञाचे अंगी असलेला तऱ्हेवाईकपणाही रसेलजवळ ठासून भरला होता. पंतप्रधान लॉईड जॉर्जविषयी त्याला फारसे प्रेम नव्हते. पण त्यांनी दिलेले भोजनाचे आमंत्रण रसेलने नाकारले नाही. पण कुठल्याशा मुद्यावर चर्चा करायला मला भोजनाव्यतिरिक्त वेळ नाही असे लॉईडने सांगितले म्हणून या गृहस्थाने भोजनाशिवाय तेथे दुसरे काही घेतले नाही. अगदी ड्रिंक किंवा सिगारेटही नाही ! पाचव्या जॉर्जने युद्धाच्या काळात दारू पिणे वर्ज केल्याची यावेळी घोषणा केली म्हणून या तऱ्हेवाईक माणसाने नेमका मद्याचा प्याला ओठाशी लावला !

चरित्राची पाने उलगडत असताना त्याच्याविषयीचा आदर वाढतो. कुतूहल वाढत जाते; पण शेवटी आपण त्याला पूर्णपणे समजून घेऊ शकलो नाही याची रुखरूख वाटायला लागते. पण ही रुखरूख आपल्याला एकट्यालाच नाही तर त्याच्या समकालिन असलेल्या वड्या माणसांनाही ती होतीच हे लक्षात येते. आणि

थोडे सांत्वन झाल्यासारखे वाटते.

माणसाने माणसासारखे वागावे, सहिष्णुता, सद्गुण, शांतता यांचे साम्राज्य जगावर असावे यासाठी या माहात्म्याने आयुष्यभर प्रयत्न केले. पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हाच त्याच्या लक्षात आले की आपल्या सगळ्या कल्पना बुरसटलेल्या आहेत युद्धाच्या खाईतून मानवाला वाचविले पाहिजे. मग तो तयारीला लागला. मनावर आलेली मळभ झटकून त्याने प्रयत्न सुरू केले.

'वॉरस् ऑफ प्रेस्टिज' या पुस्तकात तो म्हणतो, "रस्त्यात भांडत असलेली कुत्री भव्य दिव्य ध्येयाकरिता झगडत असतात असे कुणी म्हणत नाही. दुसऱ्याचे अस्तित्व पटत नाही म्हणून ती तंडत असतात. कुत्र्याच्या बाबतीत जे खरे आहे, तेच सत्य युद्ध करणाऱ्या राष्ट्रांबाबतही लागू आहे."

सत्याचा निर्भय आविष्कार हे बरट्रँडचे अंग होते. युद्धाबद्दल ब्रिटीश सरकारवर परखड टीका करताना त्याला सरकार व जनता अशा दोन्हींकडून थपडा मिळाल्या तरी तो डगमगला नाही. पटेल तेच बोलत राहिला. हे करीत असताना त्याला जबरदस्त आत्मविश्वास होता. "ओसाड जागी वाया जाणारी आरोळी मला ठोकायची नाही आहे. माझे बोलणे लोकांनी ऐकण्यासाठी आहे, त्याला त्यांनी उत्तर द्यायचे आहे."

हैड्रोजन बॉम्बची भीषणता जगाला पटवून देण्यासाठी त्याने आकाश-पाताळ एक केले. १९५४ च्या डिसेंबरमध्ये त्याचे रेडिओवरील भाषण विसरणे कठीण आहे, "माणूस या नात्याने मी तुम्हा माणसांना आवाहन करीत आहे. फक्त माणुसकी लक्षात घ्या, बाकी सर्व विसरा. एवढे केलेत की स्वर्गाचा मार्ग तुम्हाला दिसेल. नाहीतर सर्व जगाचा नाश एवढाच पर्याय उरतो."

वार्धक्याने न थकलेला आवाज ऐकणाऱ्याचे हृदय चिरून गेला. रसेलला कम्युनिस्ट व बिगर कम्युनिस्ट अशा दोन्ही राष्ट्रांत मान होता. त्याने सर्व जगातल्या शास्त्रज्ञांना विनंती करून हैड्रोजन बॉम्बच्या भयानकतेची कल्पना देणारे निवेदन प्रसिद्ध करायला लावले.

तिसरे महायुद्ध अणुयुद्ध-टाळण्यासाठी रसेलने केलेली ही मोहिम त्याच्या आयुष्यातील सर्वात मोठे यश. वयाच्या ब्यायंशीव्या वर्षी म्हातारा जगभर हिंडला ठिकठिकाणी भाषणे दिली. शास्त्रज्ञांच्या सह्या मिळविल्या. अमेरिका-रशिया-चीन किंवा फ्रान्स या सर्वच देशातील लोकांना युद्धाविषयी तिटकारा त्याने निर्माण करून ठेवला. तत्त्वज्ञान, शास्त्र, गणित किंवा साहित्य या गोष्टींत त्याने केलेल्या पराक्रमापेक्षा त्याने आपल्या आयुष्याच्या अखेरीस केलेली ही धडपड जास्त महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद वाटते.

या अष्टपैलु व्यक्तिमत्त्वाबाबत मतभेद असले तरी त्याने जागतिक शांततेसाठी केलेल्या प्रयत्नाविषयी कोणताही प्रत्यवाय वाटू नये.

२१ फेब्रुवारी १९७०

सरोज ! तुला ठाऊक नाही ग ऽ !

मी तुला पाही. नेहमीच. तुला त्याची काय कल्पना ?...

तू छोटीशीच.

तुझं माझ्याकडं पाहणंही तसंच. निर्विकार ! तू हसरी गुलाबकळी. आताशा उमलू लागलेलं एक कमळाचं फूल...

तू अगदी इवली–इवली होतीस ना...तेव्हापासून मी तुला पाही. का ते तुला कसं कळणार ?...भारतीला...तुझ्या आईला ते ठाऊक आहे.

—मी कोण ?...



मी प्रतिभा !

—प्रतिभा म्हणजे काय तुला ठाऊक आहे ?

प्रतिभा म्हणजे बुद्धी.

मी ' प्रतिभासंपन्न ' माणूस, तुझ्या आईला ते ठाऊक आहे, तुला ते कसं ठाऊक असणार ? तू हसरी गुलाबकळी...आताशा उमलू लागलेलं कमळाचं फूल ?... सरोज, हे कमळाचं फूलच माझ्या अंतरीचे स्वप्न होते. कधीतरी ते साकारणार होते. अंतरीचे गूज सत्यात अवतरणार होते. पण माझं हे गणित चुकलं...

मी म्हटलं ना— ' मी प्रतिभासंपन्न ' माणूस ! पण इथल्या माझ्या साऱ्या

# अपघात

सुरेश द. म्हात्रे

कल्पना फोल ठरल्या, माझे मनोगत धुळीस मिळाले. ज्या स्वप्नाचं ' सोनं ' होणार होतं, (असं मला वाटलं होतं) त्याच स्वप्नाची ' माती ' झाली ! जे स्वप्न माझ्या-कडून साकारलं जाणार होतं, तेच स्वप्न दुसरीकडून साकारलं गेलं, त्याला मी सत्यात येणं असं म्हणतो. ते स्वप्न म्हणजेच तू सरोज...तूच !

—अलीकडे मी तुला बोलावण्याचा निष्फळ प्रयत्न करीत असे. तुला खुणावून तुझं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत असे. पण ..तुझं लक्ष येतं न येतं तोच तुला ' कुणीतरी ' आत बोलावून घेत असे. दूध घ्यायला ..' ब्रेकफास्ट ' करायला, अथवा तुझ्या पप्पांचे कुणी मित्र आलेले असतात त्यांना तुझा गमतीदार ' ट्विस्ट डॅन्स ' करून दाखवायला.. !

...हा प्रसंग खरा म्हणजे त्या दिवसाचाच.

त्या दिवशी तुझे पप्पा आले होते. त्यांच्यासोबत कुणीतरी तुझे ' काका ' होते. पण ते लगेच परत गेले. तुझे पप्पाही, आता बहुतेक ते आठवडाभर येणार नव्हते तुमच्याकडे !...

—म्हणून आज—उद्या मी तुला भेटणार होतो. खरं पाहता भारतीला, तुझ्या आईला. मी भेटणार होतो तुम्हाला. भेटीस बोलावणार होतो...निवांत ठिकाणी.

जिथे माझ्या प्रतिभेचा फुलोरा फुलेल...माझी प्रतिभा बोलू लागेल अशा ठिकाणी. कारण तुझ्या आईला मला सांगायचं होतं. खूप खूप शिकवायचं होतं. तुला एकदा मिठीत घ्यायची होती. माझा पापा द्यायला. तुझा गालगुच्चा घ्यायला. मी तुला आशीर्वाद देणार होतो सरोज ! कारण...दुसरीकडून साकारलं गेलं असलं, तरी ते माझंच स्वप्न होतं. म्हणून तुम्हाला भेटायचं ठरवलं होतं मी.

उद्या मी तुझ्याजवळ चिठ्ठी देणार होतो. तुझ्या आईला...भारतीला द्यायला. अगदी गुपचूप. सोबत कॅडबरीचं चॉकलेट. मला ठाऊक होतं–तुझ्या आईला त्यावर नकार देता येणार नव्हता. आजपर्यंत तसे कधी झालेही नव्हते...तो माझा आत्म-विश्वास तू तिच्यापर्यंत फक्त पोहचवायचा एवढंच तुझं काम...!

तू एवढे केल्यानंतर...

...मी 'त्या' गार्डनमध्ये बसलेला ! आमच्या पूर्वीच्या ठिकाणी. भारतीचं येणं. तुला घेऊन, मी खाली मान घालून बसलेला...डोळ्यातून दोन अश्रू गाला-वर ओघळलेले.. हे चित्र. अन् मग भारतीचं येणं. प्रत्यक्ष. तिचा हात धरलेली तू !

...मी तिच्या पायांकडे पहातोय. यापूर्वीच्या भेटीत पायाला मेंदी लागलेली असायची, ती मी पहायचा. आणि आज...?

—माझं पटकन् वर पहाणं. गालावरील दोन अश्रूंचे तिला दर्शन होणं.

आणि......

'हे काय ?...'–ती.

'काय सांगू !'–माझा असहाय्यपणा. दुबळेपणा.

'काहीतरी सांगायला हवं. याचा अर्थ मी काय लावू ? माझ्यासाठी...?'

'नाही...नाही भारती. तुझ्यासाठी मी हे अश्रू गाळीत नाही. हे अश्रु आहेत सरोजसाठी...तुझ्या मुलीसाठी...तुला स्वच्छ दृष्टीने पहाण्यासाठी...'

'म्ह...ण...जे–?'

'म्हणजे माझी दृष्ट लागायची नाही तिला. तुझा कदाचित तसा समज असेल...' म्हणून नजरेचा चष्मा धुण्यासाठी अंतरात्म्यातून हे दोन अश्रु निघाले आहेत.'

'याचा अर्थ नाही कळला मला !...'

...सरोज हेच मला सांगायचं होतं तुझ्या आईला, भारतीला.

...एकेकाळचे आम्ही दोन प्रेमी. प्रीतीच्या गुलाबी मार्गावरून हातात हात गुंफून चालणारे प्रवासी. पण मलाच ठेच लागली सरोज, मी काट्यात पडलो अन् आमचे मार्ग भिन्न झाले. भारती पुढे गेली... मला मागे टाकून...माझं प्रीती-पुष्प पायदळी तुडवून...!

—त्यावेळी मला अपघात झाला, एकेकाळचा मी..., दुबळा झालो. आजही माझी हीच अवस्था आहे. पण सरोज, एकाला ठेच लागल्यावर दुसऱ्यानं त्याला

उठ वायचं असतं. यालाच मानवता म्हणतात...प्रेम म्हणतात.. प्रीती म्हणतात ! पण भारतीला हे कळलं नाही. आजपर्यंतही कळलं नव्हतं. अन् हेच मला तिला सांगायचं होतं सरोज...हेच ! त्याकरिता मला तुझी मदत हवी होती. पण—

...स...रो...ज..., काल तू हॉस्पिटलमध्ये गेली आहेस ! रस्ता ओलांडताना ती रक्तवर्णी क्रूर बस तुझ्या अंगावरून कशी गेली सरोज ? हा अपघात तुला झाला तरी कसा ?

-शारिरीक अपघातापेक्षा मनाचा अपघात मोठा असतो म्हणतात ! पण सरोज, तू हंसरी गुलाबकळी. आताशा उमलूं लागलेल कमळाचं फूल. हे कमळाचं फूलच माझ्या अंतरीचे स्वप्न होतं... स्वप्नांतून सत्यात आलेलं... दुसरीकडून साकारलं गेलेलं...पण माझंच स्वप्न— !

आणि म्हणूनच सरोज—

तुला झालेल्या अपघाताने माझ्या मनाचे दुःख वाढले आहे...पूर्वीपेक्षा शतपटीने ! पण—तुला झालेल्या अपघातापेक्षा मला झालेला अपघात फार मोठा आहे सरोज...फार मोठा ! त्या अपघाताने मी विव्हळ झालो आहे...वेदनेचे गीत गात सारं सहन करतो आहे...रक्तबंबाळलो आहे...आतून भाजलो आहे .. तरी...निमूटपणे—!

¤ ¤ ¤

---

ब्रिटन-ऑस्ट्रेलिया या जगातील सर्वात लांब हवाई शर्यतीमधील लंडन-ऑडिलेट हा भाग ब्रिटन-नॉर्मन आयलंडर विमानाने जिंकला. हे ब्रिटीश विमान ऑस्ट्रेलियातील एका ग्राहकाने विकत घेतले असून त्याच्याकडे जाताना ते शर्यतीत भाग घेऊनच निघाले. ही शर्यत सिडनी या अंतीम स्थानी संपली. या विमानाने ११ हजार मैलांचे अंतर ७६ तास ५२ मिनिटात तोडले. आयलंडर हे ब्रिटनचे जास्त यशस्वी ठरलेले विमान असून त्याच्यासाठी आजपर्यंत ३०० वर मागण्या आल्या आहेत. ते २७ देशातील ५६ वहातूक कंपन्या वापरत असून दरमहा १४ प्रमाणे त्याचे उत्पादन चालू आहे. येत्या १० वर्षात अशी एक हजार विमाने खपतील असा अंदाज आहे.

---

साहेब एरवी फार सज्जन. सरकारी कामात फरडा माणूस. घरी गेल्यावर मात्र ताटाखालचे मांजर. पत्नीपुढे त्यांचे काही चालतच नसे....

गो. ल. लिमये

# काळ आला होता पण वेळ आली नव्हती...

महत्त्वाच्या व मोठ्या हुद्यावर असलेली सुसंस्कृत व सुस्वभावी माणसेसुद्धा घरच्या परिस्थितीमुळे तसेच लोभी व लवाड सहाय्यकांमुळे लाचखाऊ बनतात. प्रथम-पासून सरळ सुतासारखी वागणारी ही माणसे पैशाच्या मोहात एकदा गुरफटली की त्यांच्या गैरवागणुकीला धरबंधच रहात नाही. अशी माणसे फार लौकर फसली जातात व पस्तावतात. ह्यातही काही पूर्वपुण्याईने संकटातून सहीसलामत सुटून उर्वरित आयुष्य सचोटीने घालवितात किंवा पैशाच्या मागे लागून संकटात सापडतात.

स्वामी हे एक मोठे अधिकारी होते. त्यांचे घराणे सुसंस्कृत व प्रसिद्ध होते. शाळा कॉलेजमधून ते प्रथम श्रेणीत चमकले. शिष्यवृत्ती मिळवून परदेशी जाऊन त्यांनी उच्च शिक्षण घेतले. आईवडिलांनी त्यांच्या परिचयातली चांगली मुलगी सुचविली; परंतु स्वामी परदेशात एका प्रेमप्रकरणात गुरफटले व त्यांना एका विजातीय मुलीशी विवाह करणे भाग पडले. नोकरीच्या निमित्ताने त्यांना निरनिराळ्या प्रांतात काम करावे लागल्याने त्यांचे व त्यांच्या आईवडिलांचे व नातेवाईकांचे संबंध बहुतेक तुटल्यासारखेच होते.



नोकरीतील पहिली तीन चार वर्षे तारुण्यसुलभ उन्मादात लवकर निघून गेली दोन तीन मुले झाली. संसाराचा व्याप वाढू लागला. मुलांना कॉनव्हेंट शाळेत घालावे लागे. हातात आलेला पगार केव्हाच संपून जाई. पत्नी खर्चिक व हट्टी, येणारी जाणारी मंडळी फार, याशिवाय क्लबचा खर्च. यामुळे साहेबांची ओढाताण फार होई. आलेला महिन्याचा पगार, भत्ता पत्नी काढून घेई. यामुळे स्वतःचा खर्च भागविणे साहेबांना कठीण झाले. काहीवेळा हाताखालच्या लोकांकडून पैसे उसने घेण्याची त्यांच्यावर पाळी येई.

साहेबांचा एकदा एका तालुक्याच्या ठिकाणी मुक्काम होता. तालुका ऑफिसची तपासणी होती. ह्या मुक्कामात साहेबांची व त्यांच्या मंडळींची बडदास्त उत्तम रीतीने ठेवली गेली. साहेबांचा मुक्काम हलला. तालुका अधिकाऱ्याकडे साहेबांनी मुक्कामात झालेल्या खर्चाबद्दल बिल मागितले. अधिकाऱ्याने बिलाचे पैसे घेण्यास नाकारले. त्याला कारण तसेच होते. तालुका अधिकाऱ्यांना साहेबांच्या मुक्कामाची काहीच झळ लागली नव्हती. ह्या खेपेस त्यांच्या तालुक्यातील एका मोठ्या सोसायटीने हा खर्च अंगावर घेतला होता. सोसायटीचा सेक्रेटरी मल्लय्या फार हुशार व धोरणी होता. तालुक्यातील कसलीही भानगड असो, मल्लय्या मद-

तीस हजर असे. अधिकाऱ्यांना भेटन तो सर्व कामे बिनबोभाट करीत असे.

साहेबांच्या मुक्कामात मल्लय्याचा व साहेबांचा चांगला परिचय घडून आला. त्यानंतर मल्लय्या साहेबांच्या बंगल्यावर जाऊ येऊ लागला. प्रत्येक भेटीत फळफळावळे, मुलांना खाऊ व बाईसाहेबांनी मागितलेल्या वस्तू आणण्यास मल्लय्या कधीही चुकत नसे.

मल्लय्याच्या गावातील एका सावकाराचे प्रकरण चौकशीसाठी साहेबांकडे आलेले मल्लय्याला कळले. मल्लय्या नेहमीप्रमाणे साहेबांना बंगल्यावर भेटला. बोलता बोलता मल्लय्याने सावकाराच्या प्रकरणाबद्दल बोलणे काढले. सावकारास सहा महिने पैसे भरण्यास मुदत पाहिजे होती. साहेबांनी तसा हुकम काढल्यास सावकार एक हजार रुपये देण्यास तयार होता. मल्लय्याने हे काम आपण बिनबोभाट करण्याची हमी दिली. तहकुबी हुकूम देण्यात साहेब गैर असे काही करणार नव्हते. साहेब कबूल झाले. त्यांच्या तंग झालेल्या आर्थिक परिस्थितीत मल्लय्याने त्यांना हात दिला. गळाला मासा लागला. आता मल्लय्या वरचेवर साहेबांकडे येऊ लागला. साहेब खूष होते. इकडे मल्लय्याचे वजन वाढले. कसल्याही भानगडीच्या कामात मल्लय्या हुकमी एक्का मानला जाऊ लागला.

साहेबांची दुसऱ्या जिल्ह्यात बदली झाली. जिल्ह्याचे ठिकाण मोठे शहर होते. घरचा खर्च आणखी वाढला. साहेबांची आर्थिक परिस्थिती आणखी बिघडली. मल्लय्या त्यांना इथेही येऊन भेटला. मल्लय्या जात्या हुशार. त्याने ह्या जिल्ह्यातही आपले संधान बांधले. नव्या जिल्ह्यातील भानगडीची प्रकरणे त्याला साहेबांच्या मार्फतच कळू लागली. संबंधित लोकांना भेटून मल्लय्या सर्व गोष्टी साहेबांच्या मनाप्रमाणे करू लागला.

साहेब एरवी फार सज्जन. बोलण्या चालण्यात त्यांची विद्वत्ता दिसून येई. सरकारी कामातही करडा माणूस. घरी गेल्यावर मात्र ताटाखालचे मांजर. पत्नी पुढे त्यांचे काहीच चालत नसे व त्यामुळे घरचा अवाढव्य खर्च थांबविणे त्यांना अशक्यप्राय गोष्ट झाली होती.

शहरात रंगण्णाचे एक मोठे हॉटेल होते. हॉटेलची भरभराट चालली होती. अर्थात ह्या भरभराटीसाठी रंगण्णास हॉटेलमध्ये गैर व्यवसाय चालवावे लागत. हॉटेलची मुख्य कमाई रात्री असे. पोलीसांची कृपादृष्टी असल्याशिवाय हे चालणे शक्य नव्हते. रंगण्णाने चुकून एका पोलीस अधिकाऱ्यास दुखविले. एका रात्री पोलीसांनी हॉटेलवर रेड घातली. एका खोलीत काही दारूच्या बाटल्या मिळाल्या. रंगण्णावर पोलीसांनी खटला भरला. रंगण्णाच्या नोकरास शिक्षा झाली. रंगण्णाच्या हॉटेलचे लायसन्सही रद्द झाले.

रंगण्णाला फार मोठा आर्थिक फटका बसला. त्याची शहरात दुसरी एकदोन हॉटेले होती. पण लायसन्स रद्द झालेल्या हॉटेलवरच त्याची सारी भिस्त होती.

पुढे काय करावे त्याला सुचेना. लायसन्स परत मिळवावयाचे झाल्यास हे काम नव्याने बदलून आलेल्या स्वामी साहेबांच्या हातात होते. त्याला कुणीतरी मल्लय्याचे नाव सुचविले. रंगण्णाने मल्लय्याची चौकशी केली व मल्लय्या शहरात येताच त्याने त्याची भेट घेतली, आणि आपली सर्व केस सांगितली. मल्लय्या साहेबांना विचारून सांगतो म्हणाला.

अलीकडे मल्लय्या साहेबांना त्यांच्या ऑफिसमध्येही जाऊन भेटत असे. ऑफिसच्या पट्टेवाल्यांना, कारकुनांना व इतर काही लोकांना मल्लय्याचे व साहेबांचे संबंध माहित झाले होते. मल्लय्याची भेट म्हटले की ही मंडळी काहीतरी शिजत आहे असे समजत. मल्लय्या साहेबांना भेटला. साहेबांनी रंगण्णाच्या केसचे कागद-पत्र मागवून घेतले. नोकरास झालेल्या सजेवरूनच हॉटलचे लायसन्स रद्द झाले असल्याने रंगण्णाच्या हॉटेलचे लायसन्स परत देण्याचा हुकूम काढणे त्यांना काही कठीण नव्हते. एक हजार रुपये मिळाल्यास रंगण्णाच्यातर्फे निकाल देण्यास साहेब कबूल झाले.

मल्लय्याने रंगण्णाकडे प्रथम दोन हजार रुपये मागितले व थोडया घासा-घासीनंतर स्वतःचे शंभर व साहेबांचे एक हजार असे अकराशे रुपये देण्याचे रंगण्णाकडून कबूल करवून घेतले. मल्लय्या धूर्त होता. त्याला गुप्त पोलीस लाच घेणाऱ्या लोकांना पकडत असल्याचे माहित होते व लाचेच्या नोटांना कोणतीतरी पावडर लावीत असल्याचेही ऐकले होते. त्यावर तोड म्हणून त्याने मार्ग काढला होता. साहेबासाठी पैसे देण्यासाठी येणाऱ्यास तो पैसे घेऊन जवळच्या बँकेत नेई व तेथे लाचेच्या नोटा बदलवून घेई. या बदललेल्या नोटा तो साहेबांना नेऊन देत असे. रंगण्णाशी बोलताना त्याने साहेबांना देण्याच्या नोटा साहेबांना प्रत्यक्ष देण्याचे पूर्वी बदलून आणाव्या लागतील म्हणून सूचना दिली होती.

रंगण्णाने घरी आल्यावर आपल्या एका विश्वासातल्या मित्रास मल्लय्याबरोबर झालेले आपले बोलणे सांगितले. मित्रास हे ऐकून फार आश्चर्य वाटले. तो म्हणाला " रंगण्णा तू म्हणतोस त्यावर माझा विश्वास बसत नाही. स्वामी साहेबांबद्दल लोक फार चांगले बोलतात. तो एक सज्जन अधिकारी गणला जातो. पहा बुवा साहेबांच्या नावाने कदाचित मल्लय्याच पैसे खात असेल. मध्यस्थ म्हणविणारे फार लबाड असतात. असल्या माणसाना गुप्त-पोलीस अधिकाऱ्यांना सांगून पकडून देऊन चांगला धडा शिकविला पाहिजे." रंगण्णाच्या मित्राची व एका गुप्त पोलीस अधिकाऱ्याची चांगली ओळख होती. त्याने रंगण्णाकडून ऐकलेली हकीकत त्याच्य कानावर घातली. ह्या अधिकाऱ्याच्या सल्ल्यावरून मल्लय्यास प्रथम रंगण्णाच्या घरी बोलावून घेऊन त्याच्याकडून पुन्हा: सर्व वाटाघाटीबद्दलचे बोलणे ऐकून घ्यावे असे ठरले.

स्वामी काही लहानसहान अधिकारी नव्हते. त्यांच्या विरुद्ध कारवाई करणे काई

सोपी गोष्ट नव्हती. उगाच काही खोटी कारवाई झाल्यास पोलीस अधिकाऱ्यांवरच प्रकरण शेकण्याची भीती होती. पोलीसांनी रंगण्णाचे व मल्लय्याचे बोलणे टेपरेकॉर्डिंग करण्याचे ठरविले. मल्लय्याला रंगण्णाने आपले घरी दुसरे दिवशी सकाळी येण्यास कळविले. तो सकाळी ९ वाजता येणार होता. रंगण्णाच्या घरात बाहेरची खोली बैठकीची होती. त्याला लागून माजघर होते. दुसरे दिवशी मल्लय्या येण्यापूर्वी पोलीसांनी बैठकीचे खोलीत मायक्रोफोन लपवून ठेवला व त्याची तार माजघरात ठेवलेल्या टेपरेकॉर्डिंग मशीनला जोडली. बाहेर चाललेले बोलणे स्पष्ट-रीतीने रेकार्ड होत असल्याची खात्री करून घेतल्यानंतर रंगण्णा बैठकीच्या खोलीत मल्लय्या येण्याची वाट पहात बसला. पोलीस माजघरात बसले. बरोबर ९ च्या ठोक्यास मल्लय्या रंगण्णाचे घरी आला.

रंगण्णास मल्लय्याकडून कोणती माहिती विचारून काढून घ्यावयाची याबद्दल पूर्ण सूचना दिल्या होत्या. मल्लय्याने आपली व स्वामी साहेबांची ओळख कशी झाली व त्याने साहेबांची कोणती कोणती कामे करून दिली, नोटा साहेबांना देण्यापूर्वी बदलून का घ्याव्या लागतात वगैरे बाबतीत जवळजवळ अर्धा तास माहिती सांगितली. साहेबांना ऑफिसमध्ये पैसे नेऊन देण्यास हरकत नाही, पैसे मिळाल्यावर साहेब रंगण्णाच्या हॉटेलच्या लायसन्सबद्दल लगेच हुकूम देतील असेही मल्लय्याने सांगितले. रंगण्णाने पैशाची व्यवस्था दोन दिवसात करतो असे मल्लय्यास सांगितले. मल्लय्या पैशाची व्यवस्था लवकर करण्यास सांगून निघून गेला.

मल्लय्याच्या साद्यंत हकीकतीवरून साहेब मल्लय्यामार्फत पैसे घेऊन कामे करीत असल्याबद्दल पोलीस अधिकाऱ्यांची खात्री झाली. मल्लय्याने रंगण्णाची ऑफिसमधेच साहेबाची भेट घडवून आणून त्याच्या समक्ष साहेबांना पैसे देण्याचे कबूल केले होते. पोलिस अधिकाऱ्यांनी टेपरेकॉर्डिंग झालेली माहिती आपल्या वरिष्ठांना कळविली व त्यांच्या संमतीने स्वामींच्याविरुद्ध कारवाई करण्याचे ठरविले. रंगण्णाने मल्लय्यास पैसे तयार असल्याचे कळविले. मल्लय्याने रंगण्णास दुसऱ्या दिवशी बारा वाजता ऑफिसमध्ये पैसे घेऊन येण्यास सांगितले.

मल्लय्या उघडरीतीने रंगण्णास स्वामी साहेबांच्या ऑफिसमध्ये भेटणार होता. ह्यामुळे त्या दोघांच्या हालचालीवर नजर ठेवणे पोलीसांना जड जाणार होते. बहुतेक सर्व स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना ऑफिसमधील लोक ओळखीत होते. रंगण्णा व मल्लय्या यांच्या हालचालीवर नजर ठेवण्यास परजिल्ह्यातील एका गुप्त पोलिस अधिकाऱ्यास बोलावून घेण्याचे ठरले. हा अधिकारी दुसरे दिवशी सकाळी १० पर्यंत येणार होता.

दुसरे दिवशी सकाळी १० वाजता पोलिस अधिकाऱ्यांनी दोन स्थानिक सद्‌गृहस्थांना पंच म्हणून बोलावून घेतले. त्यांच्यासमोर रंगण्णाकडे शंभर व दहाच्या अशा अकराशेच्या नोटा त्यांचे नंबर टिपून घेऊन नोटांना अथ्रासिन पावडर लाऊन

पोलिसांनी दिल्या व मल्लय्याच्या मार्फत सदर नोटा स्वामी साहेबांना देण्याबद्दल सूचना दिली. दुसऱ्या जिल्ह्यातून येणारा अधिकारी वेळेवर येऊ शकला नाही. त्यामुळे एका स्थानिक पोलीस अधिकाऱ्यासच मदतीस घेणे नाइलाजाने भाग पडले. बाकी उरलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना स्वामी साहेबांच्या ऑफिसजवळ लपून राहणे जरूर होते. त्यासाठी एका सिगरेट कंपनीची बंद गाडी मिळविण्यात आली. ऑफिसजवळील बँकेत मल्लय्या रंगण्णाकडे असलेल्या नोटा बदलून घेणार होता. त्यामुळे स्थानिक अधिकाऱ्यास प्रथम बँकेच्या मॅनेजरकडे नेऊन त्याची ओळख करून दिली गेली. ज्या इसमाच्या मागे हा अधिकारी उभा राहील त्या इसमाने बदलण्यास दिलेल्या नोटा बाजूस निराळ्या ठेऊन, बदलून दिलेल्या नोटांचे नंबर टिपून ठेवण्याबद्दल मॅनेजरना सूचना दिल्या गेल्या. बँक उघडल्यावर रंगण्णा मल्लय्याबरोबर बँकेत गेला. रंगण्णाचे मागोमाग साध्या कपड्यातील पोलीस अधिकारी होता. बँकेतून नोटा बदलून रंगण्णाने घेतल्या व तो सरळ मल्लय्याबरोबर स्वामींच्या ऑफिसकडे गेला. स्वामींचे ऑफिस वरच्या मजल्यावर होते. साहेब ऑफिसला आले होते. मल्लय्या रंगण्णाला घेऊन साहेबांच्या खोलीकडे गेला. पट्टेवाल्याने साहेब कुणातरी बाहेरच्या इसमाबरोबर बोलत असल्याचे सांगितले व मल्लय्याला बाहेर ठेवलेल्या बाकावर बसण्यास सांगितले. मल्लय्या रंगण्णाच्या बरोबर बाहेरच्या बाकावर आतील इसम बाहेर येण्याची वाट पहात बसला.

पाच दहा मिनिटे होऊन गेली. तितक्यात खालून कुणीतरी साहेबांच्या पट्टेवाल्यास बोलावले. पट्टेवाला खाली गेला. थोड्याच वेळात तो गडबडीने वर आला.

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत


के. टी. डोंगरे ॲण्ड कं. प्रा. लि. बम्बई-१.

त्याने मल्लय्याला बाजूस बोलाविले व तो त्याच्या कानात काहीतरी कुजबुजला. मल्लय्याचा चेहरा बदलला. तो रंगण्णाजवळ येऊन म्हणाला, "साहेब इतक्यात भेटणार नाहीत. माझ्या मुक्कामाच्या हॉटेलातील खोलीवर जाऊ या चल." असे म्हणून मल्लय्या रंगण्णाला घेऊन खाली उतरला व सरळ आपल्या हॉटेलमधील खोलीवर गेला. पोलीसांना काय घडले हे कळेना. रंगण्णा परत येण्याची वाट पहात ते तसेच लपून बसले. पंधरा-वीस मिनिटाने रंगण्णा ऑफिसकडे एकटाच परत येताना दिसला. मल्लय्याने आज साहेबाकडे जाता येणार नाही असे सांगितल्याचे रंगण्णाने पोलीसांना कळविले व आपल्याजवळ असलेल्या अकराशे रुपयांच्या नोटा त्याने पोलीसांकडे परत केल्या. पोलीसांनी घेतलेली सर्व दक्षता व मेहनत फुकट गेलेली दिसली.


बँकेत रंगण्णाच्या मागे उभा राहिलेल्या पोलीस अधिकाऱ्यास तिथे जवळच असलेल्या ऑफिसच्या सायकल—स्टँडच्या माणसाने ओळखले असावे. मल्लय्या बँकेमधून रंगण्णास घेऊन साहेबांच्या ऑफिसकडे गेल्याचे त्याने पाहिले. ही जोडी साहेबांना पैसे देण्यासच गेली असावी असे त्याने ताडले. ऑफिसच्या आवारात गुप्त पोलिस अधिकाऱ्याचे अस्तित्व पाहून काहीतरी धोका असावा असे समजून त्याने लागलीच साहेबाच्या पट्टेवाल्यास ऑफिसच्या आवारात पोलीस असल्याची जाणीव दिली. पट्टेवाल्याने ही हकीकत मल्लय्यास बाजूस बोलावून सांगितली. चाणाक्ष मल्लय्याने रंगण्णास आता साहेबाकडे नेणे धोक्याचे आहे हे ओळखून तो रंगण्णास घेऊन आपल्या खोलीवर गेला व साहेबांना पुन्हा नंतर भेटू असे सांगून त्याला पाठवून दिले.

मल्लय्या व रंगण्णा ऑफिसमध्ये आलेल्या वेळी भेटण्यास दुसरे कोणी आले नसते तर मल्लय्या रंगण्णास घेऊन लगेच आत जाऊ शकला असता व साहेबांना त्याने रंगण्णाकडून एक हजार रुपये देवविले असते. पण स्वामींचे नशीब बलवत्तर. काळ आला होता पण वेळ आली नव्हती हेच खरे.

◻ ◻ ◻



श्री. पु. शि. रेगे हे वर्धा येथे भरलेल्या अठ्ठेचाळिसाव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्या सन्मानाबद्दल त्यांचा पारंपरिक पद्धतीने सत्कार करण्याऐवजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने श्री. रेग्यांच्या विविध वाङ्मयनिर्मितीचा आढावा घेणारी एक व्याख्यानमाला त्या वेळी आयोजित केली होती. प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने, ही व्याख्यानेच संकलित स्वरूपात मराठी वाचकासमोर आली आहेत. स्तुतिपर भाषणमालेच्या रूपाने होणाऱ्या औपचारिक सत्कारापेक्षा अभ्यासपूर्ण व्याख्यानमालेची योजना कल्पक होती. परंतु व्याख्यानांचा संग्रह नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची चालकांची योजना वक्त्यांना माहीत होती की नाही



# पु. शि. रेगे वाङ्मयदर्शन—

सौ. पुष्पा भावे

याविषयी हे पुस्तक वाचताना शंका निर्माण होते. कारण या मुद्रित व्याख्यानांचे स्वरूप नैमित्तिकच राहिले आहे : पुस्तकनिविष्ट होताना या व्याख्यानांचे फारसे पुनर्लेखन झालेले असेल असे वाटत नाही.

श्री. रेगे यांच्या ‘ छांदसी ’ या साहित्य–कलाविषयक ग्रंथाचा परामर्श, डॉ. गं. व. ग्रामोपाध्ये यांनी, ‘ प्रा. पु. शि. रेगे यांचा साहित्यविचार ’ या लेखात घेतला आहे. अशा पुस्तकात, श्री. रेग्यांच्या साहित्यविचाराची चर्चा समकालीन मराठी साहित्यविचाराच्या संदर्भात व्हावी व त्यातून काही मूलभूत प्रश्न निर्माण व्हावे, अशी साहजिक अपेक्षा होती. परंतु डॉ. ग्रामोपाध्यांसारख्या ज्येष्ठ प्राध्यापकाने श्री. रेग्यांच्या विचाराचा केवळ सारांश देण्याचे का पत्करले नकळे. विवेचनाच्या ओघात डॉ. ग्रामोपाध्यांनी जे प्रश्न विचारले आहेत, तेसुद्धा, बरेचसे, विश्लेषणापेक्षा त्यांच्या लेखन–लकबीतून निर्माण होतात की काय अशी शंका वाटते. कारण

श्री. रेग्यांच्या साहित्यविचाराचा सारांश दिल्यावर पुढे डॉ. ग्रामोपाध्ये म्हणतात, "त्या साऱ्यांची चिकित्सा करण्याचा येथे उद्देश नाही. कारण त्यासाठी त्यांनी ज्या वेगवेगळ्या संज्ञांची योजना केली आहे त्या संज्ञांची अन्य विचारवंतांच्या संज्ञांशी असलेली वेगळीक पारखावी लागेल...तात्त्विक प्रमेयांच्या मांडणीमागील तर्कशुद्धता पाहावी लागेल...त्यानंतरच रेगे यांच्या विचारसूत्राला औपपत्तिक महत्त्व येऊ शकेल. परंतु ही अशी चिकित्सा वा परीक्षा प्रस्तुत अभिप्रेत नाही." (पृ. १२) म्हणजे या विषयावरील चर्चा कशी असावी हे डॉ. ग्रामोपाध्ये वाचकांना सांगतात; पण आपल्या लेखात मात्र ती पद्धती अवलंबीत नाहीत. का? स्थलकालमर्यादा कारणीभूत असेल असे म्हणावे तर, दहा पृष्ठे श्री. रेग्यांच्या साहित्यविचाराचा सारांश देण्यासाठी वापरण्याइतका 'छांदसी' हा ग्रंथ दुर्मिळ नाही. श्री. रेगे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण अभ्यास करणाऱ्या या ग्रंथातील हे महत्त्वाचे प्रकरण भावी अभ्यासकाच्या दृष्टीने असे मर्यादित ठरते.

श्री. रेग्यांच्या नाटकांचे समीक्षण श्री. चिं. त्र्यं. खानोलकर या नवीन नाटककाराने केले आहे. श्री. रेग्यांची नाटके रंगमंचावर आली नाहीत याविषयीचा खेद व्यक्त करून श्री. खानोलकर म्हणतात, " – ती जर का रंगमंचावर खेळली गेली तर कदाचित रंगमंचाला पुन्हा एकदा सौभद्र किंवा शारदा किंवा मृच्छकटिक या नाटकांनी दिलेली गीतात्म लय मिळेल" (पृ. २२) येथे श्री. खानोलकर यांना 'गीतात्म' म्हणजे 'लिरिकल' असा अर्थ अपेक्षित होता असे म्हणावे तर शारदा-मृच्छकटिक ही काही 'लिरिकल' नाटके नव्हेत. आणि खानोलकर आजच्या नाटकांना संगीत नाटके म्हणताना, पूर्वीची संगीत नाटके व आजची संगीत नाटके यात कोणता भेद मानतात, ते नेमके स्पष्ट होत नाही. मात्र श्री. रेग्यांची नाटके, त्यांच्या कादंबऱ्यांप्रमाणेच गीतात्म आहेत यात शंका नाही. श्री. रेग्यांची नाटके रंगभूमीवरील परंपरेहून संपूर्णतः भिन्न आहेत; परंतु भारतीय सांस्कृतिक आकृत्यांशी अतिशय निगडित आहेत, हा आंतर्विरोध श्री. खानोलकरांनी संवेदनक्षमतेने जाणला आहे. फक्त श्री. खानोलकरांनी, श्री. रेग्यांच्या नाट्यकृतींमधील विशुद्ध नाट्य आणि मराठी रंगभूमीवरील कथात्म नाट्याविषयीची परंपरा यातील विरोध स्पष्ट केला असता तर श्री. रेग्यांच्या नाटकांचे ऐतिहासिक मोलही सिद्ध झाले असते. या नाटकांच्या संदर्भात, "नाटक जेथे संपते तेथे त्याचे चिंतन सुरू होते" हे विधान समीक्षकाने नेमके कोणत्या अर्थाने वापरले आहे ते उमगत नाही. हे विधान मल्यात्मक नसेल अशी आशा आहे.

श्री. रेग्यांच्या नाटकांविषयीचे कुतूहल मर्यादित रसिकांमध्येच असेल; परंतु रेग्यांची कविता मराठी रसिकाला तिच्या विशेषत्वाने परिचित आहे. आणि या कवितेचे रसग्रहण श्री. दिलीप चित्रे यांच्यासारख्या एका रसिक नवकवीने केलेले असल्यामुळे त्याविषयीच्या अपेक्षा उंचावल्या गेल्या होत्या. प्रारंभीच त्यांनी

सांगितल्याप्रमाणे रसग्रहण व त्यातून रेग्यांच्या काव्यातील समान गुणांचा शोध, असा त्यांच्या लेखाचा हेतू आहे. संस्कृतोत्पन्न शब्दांमुळे रेग्यांच्या कवितेतील आवाहनशक्ती कमी होते हा रसग्रहणात श्री. चित्र्यांनी मांडलेला मुद्दा अनेकांना (व स्वतः रेग्यांनाही) अप्रिय वाटला तरी विचारार्ह आहे. किमानपक्षी, मानसशास्त्राधिष्ठित भाषाशास्त्राचा (मायकोलिंग्विस्टिक्स) काव्यचर्चेत वापर करणे आक्षेपार्ह नाही, एवढा विचार मराठी साहित्यिकाने मान्य करायला हरकत नसावी. श्री. चित्रे यांनीही श्री. खानोलकरांप्रमाणे, श्री. रेग्यांच्या साहित्याविष्कारातील अ-पारंपरिक व पारंपरिक यांचे नाते चातुर्याने स्पष्ट केले आहे. तसेच श्री. चित्रे यांनी श्री. रेग्यांच्या काही कवितांच्या रसग्रहणाचे जे प्रात्यक्षिक दाखवले आहे त्यामुळे रसिकांना कविता कशी वाचावी या प्रश्नाच्या उत्तराची एक प्रभावी दशा सापडेल यात शंका नाही.

श्री. रेग्यांच्या कथा-कादंबऱ्यांचा आढावा प्रा. गंगाधर पाटील यांनी घेतला आहे. श्री. रेग्यांच्या काव्यात्म कादंबऱ्यांच्या अर्थाचे अनेक स्तर त्यांनी संवेदनक्षमतेने उलगडून दाखवले आहेत. फक्त हा लेख वाचत असताना, त्यांनी (म्हणजे श्री. पाटील यांनी) निवेदनासाठी योजलेली कृतककाव्यात्म शैली टीका विवेचनाला पोषक नाही, हे प्रकर्षाने जाणवत राहते....श्री. रेगे 'छंद' या दिवंगत मराठी मासिकाचे संकल्पक आणि संपादक होते. त्यांच्या या



## साभार स्वीकार

**दिनदर्शिका**

कोहिनूर एजन्सी – पुणे
पॅपको मिल्स – पुणे
देसाई पटेल पेपर कंपनी – पुणे
सोविएत लँड ऑफिस – मुंबई
सोविएत देश – मुंबई
प्रोफिशिएन्ट इन्स्टिटयूट – पुणे
युनायटेड इंक – मुंबई
वाय. एल्. थत्ते अँन्ड कंपनी – पुणे
जवाहर ट्रेडिंग कंपनी – पुणे
एम्. आर्. जोशी – पुणे
प्रकाश टाइप फाउंड्री – पुणे

**दैनंदिनी**

दि मॉडर्न पेपर स्टोअर्स – पुणे
चिमणलाल पेपर कंपनी – मुंबई
रघुनाथ लिथो वर्क्स – मुंबई

संपादकीय कर्तृत्वाचा आढावा प्रा. रा. भि. जोशी यांनी घेतला आहे. प्रथमतःच, हा विषय निवडल्याबद्दल प्रा. जोशी यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. या लेखामुळे, काही वर्षांनी सहजच जी अस्तंगत झाली असती अशी काही माहिती ग्रंथनिविष्ट झाली आहे. परंतु प्रा. जोशी यांनी प्रस्तुत लेखात, मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकांच्या परंपरेतील 'छंद'च्या स्थानाचे मूल्यमापन केले असते तर हा लेख अधिक उपयुक्त झाला असता. श्रीमती लतिका जोशी यांनी 'छंद'ची सहा वर्षांची सूची परिश्रमपूर्वक संकलित केली आहे, त्याचे मोल अभ्यासकाला केवढे आहे हे वेगळे सांगायला नकोच. मात्र या सूचीसमवेतच रेगे-वाङ्मयाची सूची व त्यांच्या वाङ्मयावर प्रसिद्ध झालेल्या लेखांची सूची अंतर्भूत केली असती तर संदर्भसाहाय्यक म्हणून या ग्रंथाची उपयुक्तता वाढली असती.

या ग्रंथातील पहिला लेख स्वत: श्री. रेग्यांचा असून त्यात त्यांनी आपली साहित्यविषयक भूमिका मांडली आहे. नेहमीच्या प्रांजळपणाने श्री. रेग्यांनी हा लेख लिहिला आहे. परंतु काही वेळा प्रांजळपणाही अभिनिवेशी होऊ शकतो. 'कालयवन' हे आपले नाटक रंगभूमीवर येणार होते; परंतु आले नाही, याविषयी लिहिताना, "...पण विजया जयवंतांनी आयत्या वेळी माघार घेतली. 'तुझे आहे तुजपाशी'तील लोकसुलभ भूमिका त्यांना अधिक महत्त्वाची वाटली." (पृ. ५) असा आरोप सौ. विजया मेहता (पूर्वाश्रमींच्या कु. विजया जयवंत) यांच्यावर केला आहे. ज्या निष्ठाशील दिग्दर्शिकेने प्रायोगिक रंगभूमीसाठी अनेकवार व्यावहारिक फायद्याकडे पाठ फिरवली आहे तिच्याबद्दलचा हा आरोप अवाजवी वाटतो. (त्या वेळी प्रत्यक्ष घटना काहीशा वेगळ्या घडल्या होत्या, पण त्यांचा उल्लेख येथे अप्रस्तुत आहे.) 'कालयवन'सारखी नाटके मराठी रंगभूमीवर यायला हवीत, या श्री. रेग्यांच्या भावनेशी रसिक खचितच सहमत होतील; पण त्या संदर्भात व्यक्तिसंदर्भ टाळणे उचित होते. या लेखात, मराठी माणसाने लिहिलेली ती मराठी कविता असा काव्याविष्काराबद्दलचा एक नवा विचारार्ह मुद्दा श्री. रेग्यांनी मांडला आहे. परंतु तो विशद मात्र झालेला नाही.

'पु. शि. रेगे वाङ्मयदर्शन' या ग्रंथाचे स्वरूप वरीलप्रमाणे लेखसंग्रहाचे आहे. त्यामधून श्री. रेग्यांच्या अनेकविध वाङ्मयीन कर्तृत्वाचे दर्शन होत असले तरी एका समृद्ध वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे सांगोपांग विश्लेषण मात्र होत नाही. बहुधा आधी व्याख्यान आणि नंतर त्याचाच लेख या स्वरूपाची मर्यादा या पुस्तकावर पडली असावी. तरीही सत्कारसभेतील हवेवर विरणाऱ्या स्तुतिपर शब्दांऐवजी हा मराठीतील एका लक्षणीय सारस्वताचे वाङ्मयदर्शन घडविणारा लेखसंग्रह सादर केल्याबद्दल मराठी वाचक मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या योजकतेचे सकौतुक आभार मानतील यात शंका नाही.

**[पु. शि. रेगे वाङ्मयदर्शन, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन आवृत्ती पहिली : १९६९, किंमत चार रुपये. पृष्ठे : १२८]**

# समाजवादाची रात्र आहे जागा राहा !....

पृष्ठ २० वरून...

त्याला विचारले, "तुम्ही अहमदाबाद सोडून पुण्याकडं का जात नाही ?"

"तिकडंही एक निराळीच भीती आहे." तो शांतपणाने बोलला, "तिथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आहे. पुढच्या पिढीत मुलांना सरकारी नोकऱ्या मिळणार नाहीत...सातारा-कऱ्हाडकडं शेती करणंही कठीणच....जातीमुळं महाराष्ट्रातील खेडेगावांत यापुढं टिकाव लागणं अशक्य."

अर्थशास्त्राचा एक प्राध्यापक म्हणाला, "आपलं राजकारण फार सवंग आहे. समाजवाद आणि बँकांचं राष्ट्रीयीकरण याबद्दल पदवीधर माणसालादेखील नीटपणानं सांगता येणार नाही. आता तर रिक्षा ड्रायव्हर आणि मोलकरणीदेखील त्या विषयावर बोलत आहेत. आपला समाज अज्ञ आहे आणि त्याला न पेलणाऱ्या प्रश्नांची उत्तरं कानीकपाळी ओरडली जात आहेत. याबद्दल एक उपमा सुचते. सांगू का ?"

"सांगा ना...त्याबद्दल परवानगी कशाला ?"

"उपमा थोडी अश्लील आहे पण तरीही सांगतोच. सात-आठ वर्षांच्या मुलीला एखाद्या वयस्कर माणसानं तिच्या बालीशपणाचा फायदा घेऊन नादी लावावं, तिच्या शरीराशी चेष्टितं करावीत आणि तिच्या अपरिपक्व, – वयात न आलेल्या शरीरात नि मनात विकृत कामवासना निर्माण कराव्यात तसं आपल्या समाजवादाचं आहे. निरक्कल आणि मूर्ख लोकांच्या मनात आपण नको त्या भावना चेतवल्या आहेत...."

गाडी मुंबईकडे केव्हा निघाली हे मला कळलेच नाही. मी आपल्याच नादात होतो. पहिल्या वर्गाचा डबा होता; तिथल्या झुळझुळीत लोकांशी माझं नातं नाही असं वाटत होतं. पारगावकर त्या लोकांत जास्त रमले होते. ते मुलाखती घेत असावेत. मी मात्र गप्पच होतो.

मुंबईस पोचायला दुपारचे चार वाजले. आम्ही तडक काँग्रेस अध्यक्ष बाबू जगजीवनराम यांची मिरवणूक पाहण्यासाठी खोदादाद सर्कलपाशी जाऊन उभे राहिलो. दुपारचे ऊन तळपत होते. हजारो लोकांचा समुदाय होता. मोठमोठ्या ट्रक्समधून गिरणगावातून माणसे आणली जात होती. मिरवणुकीची मार्गप्रतीक्षा करीत आम्ही दोघे उभेच होतो.

बराच वेळ झाला, मिरवणूक येईचना. कुणीतरी सांगितले 'जगजीवनराम अजून आलेच नाहीत' पारगावकर म्हणाले, 'ते जावयाप्रमाणं रुसले असतील...मला उपपंतप्रधान करा तरच मी मिरवणुकीत येतो, असा त्यांचा हट्ट असेल.' मी हसलो

आणि समोर बघायला लागलो. त्या मोठ्या रस्त्यामध्ये आता माणसांची खेचाखेच झाली होती. कुठेच काही शिस्त नव्हती. मोटारीतून गांधी टोप्या घातलेले तुपट चेहऱ्याचे श्रेष्ठी दूरध्वनिक्षेपकांवरून जनतेस शांत राहण्याबद्दल सांगत फिरत होते. इतक्यात माझे लक्ष एका गोष्टीकडे गेले आणि मी खूप हसलो. ..पाच...दहा मरतुकड्या घोड्यांवर मराठेशाही सरदारांचे पोशाख केलेले, कळकट, घाणेरड्या आणि निस्तेज चेहऱ्याचे घोडेस्वार खादादाद सर्कलकडून दादरकडे निघाले होते. मुंबईच्या या प्रचंड रस्त्यात, गगनचुंबी इमारतींच्या पार्श्वभूमीवर ते मराठा बारगीर अगदीच केविलवाणे दिसत होते ..इंदिरा काँग्रेस ही पुरोगामी आहे असा पुकारा केला गेला आहे ..ती समाजवादीही आहे ..तिचं जुन्या जगाशी नातं नाही असं सांगितलं जातं. अशा वेळी ते कळकट घोडेस्वार काँग्रेसच्या मिरवणुकीत कशाला ?...खरे तर घोडेस्वारांची जरुरी नव्हती. पण ते असायलाच हवे असतील, तर निदान चांगले तरी असायचे होते ! ...मी पारगावकरांना म्हटले, ' यापेक्षा मुंबई काँग्रेसने भालजी पेंढारकरांना कॉंट्रॅक्ट द्यायला हवं होतं. त्यांनी त्यांच्या छत्रपति शिवाजी चित्रपटातले स्वार नक्कीच दिले असते...एवढंच कशाला ? सूर्यकांत आणि चंद्रकांत या दोन नटांना त्यांनी शिवाजी, तानाजी बनवून इथं आणलं असतं. आणि सुलोचनाबाईंना डोक्यावरून पदर घेऊन खोदादाद सर्कलपुढे त्यांना ओवाळायला लावलं असतं तरीही मोठी मजा आली असती.'

पारगावकर काही बोलणार होते, इतक्यात उजव्या हाताकडून मिरवणूक आल्याची द्वाही फिरली. पुढे नगारा होता. मागून लेजीम होते...तलवारीचे हात असायलाच हवेत ! ...गणपतीच्या मिरवणुकीत जेवढे सगळे असते तेवढे सगळे तिथे होते. प्रथम बरेचसे ट्रक गेले. त्यावर गावांच्या मोठ्या पाट्या होत्या...कडूस... पाटण...कऱ्हाड...कोरेगाव !..सगळा सातारा जिल्हा होता. कडूसहून आणि कोरेगावाहून काँग्रेसप्रेमाने इतकी माणसे कशी आली, हा जसा एक प्रश्न होता, तसाच महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांतून फारसं कोणी कसं आलं नव्हतं, हा दुसरा प्रश्न होता. सोलापूर...नगर...खानदेश...विदर्भ...मराठवाडा...यांतली जवळजवळ एकही पाटी दिसली नाही. हे इतर जिल्हे काँग्रेस प्रेमात इतके मागासलेले का ?... मिरवणूक बघत उभ्या असलेल्या एका माणसाला मी ही शंका बोलून दाखवली तेव्हा तो हसत म्हणाला, ' मंत्र्यांच्या संख्येच्या प्रमाणात त्या त्या जिल्ह्यातले लोक यायचे असं ठरलं असावं. सातारा जिल्ह्यातले बहुसंख्य मंत्री असल्यामुळं तिथले लोक जास्त आले आहेत.'

' घोडदळ ' पुढे गेले आणि मागून बऱ्याच वेळाने चार पांढऱ्या घोड्यांच्या रथात छत्रचामरे ढाळीत अध्यक्ष महोदयांची स्वारी येती झाली. रथ तितकासा ऐटबाज नव्हता. वरचे छत्र बरे होते. खुद्द अध्यक्ष जगजीवनराम बाबू हे तर अगदीच कळाहीन दिसत होते. त्यांच्या मानाने स्वागताध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील हे

किती तरी तजेलदार आणि तरतरीत वाटत होते. मिरवणूक चाललीच होती.

मी आजपर्यंत अनेक पुढाऱ्यांच्या मिरवणुका बघितल्या आहेत. नेहरूंची बघितली आहे. बाबू राजेन्द्र प्रसादांना मिरवत नेताना पाहिले आहे. परंतु जगजीवनराम यांच्यासारखी उनाडटप्पू मिरवणूक मी आजपर्यंत कोणत्याही काँग्रेस श्रेष्ठीची पाहिली नाही. जगजीवनराम हात हालवून लोकांच्या नमस्कारांचा स्वीकार करत होते. आणि गर्दीच्या कडेला उभा राहून मी त्यांच्याकडे पाहत होतो....खेद वाटला ...ज्या गादीवर लो. टिळक, म. गांधी, नेहरू पिता-पुत्र, सरदार वल्लभभाई, राजेन्द्र प्रसाद असे, या देशातले सर्वोत्तम नेते विराजमान झाले होते त्या गादीवर जगजीवनरामसारखे करबुडवे मिरवत चालले होते...जगजीवनरामच्या आयुष्याचा सर्व इतिहास डोळ्यापुढून जात होता...एवढ्या महनीय स्थानावर बसण्यासाठी या महाभागाने कोणती देशसेवा केली होती ?...मन इतिहास धुंडाळायला लागले. जमेच्या बाजूला काहीच सापडेना...अस्पृश्य समाजातला असणं हीच एक बहादुरी होती. 'सेक्युलर' भारतात, अस्पृश्य, मुसलमान आणि प्रांतोप्रांतीच्या विशिष्ट जातींना भाव मिळाला. त्यामुळे जगजीवनराम प्याद्याचे फर्जी झाले !...त्यांच्या दुर्दैवाने ते हरिजन नसते, ब्राह्मणात जन्मले असते तर त्यांची धाव सामान्यत्वा-पलीकडे पोचली नसती, हे उघड आहे....मिरवणूक चाललीच होती. स्वतःला विसरून मी त्या घोळक्यात उभा होतो.

दुसऱ्या दिवशी आझाद मैदानावर जाऊन काँग्रेसचा मंडप बघितला. इंदिरा गांधींचे भाषण ऐकले आणि पुण्याकडे निघालो. भाषणात समाजवादाचं तेच पुराण होतं त्यामुळं कान किटले.

गाडी पुण्याकडे पळत होती. मन उदास झाले होते. कुणालातरी पोचवून स्मशाना-नातून यावे त्याप्रमाणे वैराग्याचे विचार येत होते. एवढी गर्दी बघितली, इतकी भाषणे ऐकली त्यांचा उपयोग काय हा प्रश्न मनापुढे उभा राहिला.

राजकीय पक्षांच्या अधिवेशनाचा साचा आता ठरलेला आहे...मोठ्या मिरवणुका, हत्तीवरून वा बैलावरून अध्यक्षांचे आगमन, स्वयंसेवकांची मानवंदना, समाजवादा-वरची आणि जातीयवादावरची अक्राळ विक्राळ आणि कंठाळी भाषणे...विषय नियामक समिती आणि ठराव !...सगळे ठरलेले. हा साचा बदलल्याशिवाय देशाला भले दिवस येणार नाहीत.

पारतंत्र्याच्या काळात गर्दी जमवण्याला आणि भाषणबाजीला काही अर्थ होता. लाखो लोकांच्या सभांचा दाब परकीय राज्यकर्त्यांच्या मनावर पाडण्याचा हेतू समजू शकतो. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इतकी जत्रा भरवण्याचे कारण काय ? या लाखो लोकांना असल्या अधिवेशनांपासून राजकीय शिक्षण मिळते असे खरोखरी समजणारा एकतरी महामूर्ख असेल का ? पुण्यास ज्ञानेश्वरांची पालखी दरवर्षी येते. तिच्या मिरवणुकीत हजारो खेडूत 'ग्यानबा तुकाराम' करीत भक्तिभावाने सामील

होतात. त्यांपैकी किती जणांना ज्ञानेश्वरी कळते ?...गीतेचा अर्थ कुणा कुणाला लागतो ? परंतु उन्हा-पावसामधून हजारो लोक स्वतःचा कामधंदा सोडून आपले दिवस त्या मेळाव्यासाठी खर्ची घालतात याचे कौतुक होते. राजकीय परिषदांचेही तसेच आहे. ठिकठिकाणी छोटी अभ्यास मंडळे स्थापन केली तर शुद्ध राजकीय ज्ञान प्रसृत करता येईल. परंतु तसे होत नाही. ' लाखो लोकांचा मेळावा ' हे निरर्थक शब्द अजूनही आपल्या मनाला मोह घालतातच.

मिरवणुका आणि मोर्चे यांच्याबद्दल माझ्या दोन आठवणी आहेत. सदतीस साली काँग्रेसची मंत्रिमंडळे गादीवर आली असताना शेतकऱ्यांचा एक ' प्रचंड ' मोर्चा पुण्याच्या कौन्सिल हॉलपुढे आला होता. त्या वेळचे मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर हे मोर्च्याच्या भेटीस पुढच्या बाजूने न येता मुद्दामच मागच्या बाजूने आले आणि त्यांनी दोन-तीन शेतकऱ्यांना " तुम्ही इथं कशासाठी आला आहात ?" असा प्रश्न केला. ते लोक गोंधळले आणि म्हणाले, " आम्हांला चला म्हणाले. आम्ही आलो...आम्ही कशासाठी आलो, कुणास ठाऊक !"...दुसरी आठवण श्री. बाबूराव सणस आणि एस. एम. जोशी यांच्या निवडणुकीच्या वेळेची आहे. मंडईतून तेव्हा स्त्रियांची एक ' प्रचंड ' मिरवणूक काँग्रेसतर्फे काढण्यात आली होती. त्या मिरवणुकीत अग्रभागी वेश्या होत्या. त्यांना नवी पातळे दिली गेली होती. आणि त्या उच्च स्वरात (शिकवलेल्या) घोषणा करत होत्या. मंडईतले एक प्रसिद्ध व्यापारी रस्त्याच्या कडेला उभे राहून मिरवणुक बघत होते. तिकडून काकासाहेब गाडगीळ जात असताना ते तावातावाने काकांना म्हणाले, " काका, आज डोळ्याचं पारणं फिटलं...काँग्रेसच्या मिरवणुकीत रांडांची भरती झाली !...ही हद्द आहे. "...या दोन्ही आठवणी तंतोतंत खऱ्या आहेत. कारण त्या दोन्ही वेळा मी तिथे हजर होतो.

गर्दीच्या वेडापेक्षाही आपल्या आजच्या राजकारणात घोषणांचे वेड भयंकर आहे. बोलल्याप्रमाणें वागणें, आणि त्यासाठी त्याग करणें ही गोष्ट सगळेच विसरले आहेत. आज जातीयवादाचा बुजबुजाट झाला आहे. पण तोंडाने मात्र प्रत्येक सभेत सेक्युलॅरिझम्‌चा घोष होतो. भ्रष्टाचार, काळाबाजार या गोष्टी न करणारा माणूस आज नाही. पण सभेत नि लेखात प्रत्येकजण त्याविरुद्ध घोषणा करतो. आज प्रत्येकजण साम्यवादी आहे. श्रीमंत बागाईतदार, बडे गिरणीमालक, साखरेचे कारखानदार आणि संस्थानिक, सगळेच ' दारिद्र्य हटाव ' म्हणणारे आहेत....हे सर्व फार भयंकर आहे. भाषा एक आणि कृती वेगळी असा आजचा जमाना आहे. ' जग ही माया आहे ' असे वेदांती म्हणत; परंतु दोन-दोन तीन-तीन बायका करून अनेक तऱ्हेचे विषयोपभोग घेत, त्यातलाच हा प्रकार ! या खोटेपणापासून आपला देश कसा वाचेल कुणास ठाऊक ! वेश्येचा धंदा करणें वाईटच. परंतु वेश्येने पतिव्रतेची भाषा वापरायची आणि आरती ओवाळून घ्यायची, हे त्याहून वाईट. आज तसंच चाललं आहे.

विचार करता करता मी बधीर झालो. काहीच सुचेना. मग शेवटी अहमदाबादला मिळालेली काही पत्रके वाचत बसलो.

...एके ठिकाणी लिहिले होते, सरदार पटेल म्हणतात–

" I have loved Nehru, but he has not reciprocated. I have not been able to make him see the dangers ahead.

China wants to establish its hegemony over South East Asia. We cannot shut our eyes to this, because, Imperialism is appearing in a new garb.

Nehru is being misled by his courtiers. I have grave apprehensions about the future. "

एका पत्रकात असे होते–" इंदिरा गांधींनी देशाला काय दिले ?" उत्तरही पुढे होतेच...

" Is there a food and price policy for the Nation ?"

" No. "

" Is there cloth and price policy for the Nation ? "

" No. "

" Is there an Industry and employment policy for the Nation ?"

" No. "

असे, अनेक नकारार्थी उत्तरे असलेले प्रश्न लिहिले आहेत आणि शेवटी म्हटले आहे,

" In short, there is not a single branch of life, in India which can claim to have a uniform and National Policy "

मी त्या प्रश्नोत्तरांकडे बराच वेळ बघत राहिलो. पुणे केव्हा आले हे कळलेच नाही.

रात्र झाली होती. थंडीचा कडाका होता. रिक्षामध्ये पारगावकर आणि मी सारखे अहमदाबादबद्दलच मोठमोठ्याने बोलत होतो. पारगावकरांना घरी सोडले आणि रिक्षा माझ्या घराकडे निघाली.

मान वळवून रिक्षा ड्रायव्हरने विचारले, " काय साहेब, अहमदाबादला गेला होतात काय !"

मी म्हणालो. " होय...कॉंग्रेस बघण्यासाठी गेलो होतो. "

त्याने विचारले, " किती गर्दी होती ?"

मी सांगितले. " खूपच...असतील दोन-चार लाख लोक– "

माझे बोलणें त्याला आवडले नसावे. तो म्हणाला, " मुंबईच्या कॉंग्रेसला जास्त गर्दी असेल नाही ?"

तो इंडिकेटवाला असावा हे उघड होते. मी काही बोलणार इतक्यात तोच पुढे म्हणाला, "साहेब, इंदिरा गांधींचा जय व्हायला हवा. आम्हांला रिक्षाकरता कर्ज मिळणार आहे. आमचे लोक गेले आहेतच...आणि मग इथं सगळे लोक सारखे होतील. गरीब कुणी राहणारच. नाही."

एवढ्या वेळात रिक्षा आमच्या बंगल्यापुढे उभी राहिली आणि मी खाली उतरलो. तो बोलण्याच्या भरातच होता. "साहेब, इंदिरा गांधीचं राज्य झालं की सगळ्यांनाच बंगले मिळतील...मला बघा, एक खोली आहे. सात–आठ माणसं आम्ही राहतो. तिथं पाणी नाही, संडास नाही. पण थोड्याच दिवसांत हे सगळे बंगले लोकांच्या मालकीचे होतील."

प्रवासाने दमलो होतो पण तरीही मी हसलो. रिक्षावाल्याकडे त्या अंधारातही डोळे फाडून पाहिले. चोवीस-पंचवीस वर्षाचे वय होते. गालफडं बसली होती. डोळ्यात मुळीचही तेज नव्हते.

खाली वाकून मी मीटरकडे पाहिले. पावणे दोन रुपये झाले होते. पण खुशीने दोन रुपये दिले.

"आठ-नऊ वर्षांच्या अजाण मुलीच्या शरीराशी चेष्टिते करून तिच्या वासना विकृत पद्धतीने जाग्या करण्याप्रमाणेच अशिक्षित, भोळ्या लोकांना समाजवादाचे वेड लावणे हा प्रकार आहे," असे अहमदाबादला एक प्राध्यापक बोलले होते त्याची आठवण झाली.

अंधारात ठेचा खात मी घरात आलो. बटण दाबले पण दिवा लागला नाही. वीज गेली होती. आरामखुर्चीत देह लोटीत मी पुटपुटलो, "राजा, समाजवादाची रात्र आहे. जागा राहा."

[ क्रमशः ]

---

पॅलेस्ताईन मुक्तीसंग्रामाचे लहान मुलांचे एक लढाऊ दल असून त्याच्या अशवाल येथील छावणीमध्ये कागदाच्या एका फलकावर मेणाच्या रंगात अर्धवट चितारलेली सूत्रे आहेत. त्यापैकी एक सूत्र; "आमची क्रांती रक्ताचा एक थेंब, घामाचा एक थेंब, आणि शाईचा एक थेंब आहे."

---

## दोन टोके, दोन जगे....

[ पृष्ठ १५ वरून ]

समोर जमलेल्या मंडळींचे मख्ख चेहरे, चेहऱ्यांवर प्रतीत होणारे अज्ञान पाहून वाटले,–माझा आणि या मंडळींचा संबंध काय? यांचे जग वेगळे. मी, माझे पुण्या–मुंबईतील बांधव, वृत्तपत्रीय प्रसिद्धीवर जगणारे पुढारी, यांनी आतापर्यंत या मंडळींसाठी काय केले? स्वातंत्र्यप्राप्ती इतिहासजमा होण्याइतकी जुनी झाली, तरी देशाच्या ८० टक्के जनतेचे प्रतिनिधित्व करणारा हा समाज आहे तिथेच आहे. यांच्या उत्थापनासाठी कोणी जास्त प्रयत्नच केले नाहीत का, निदान या समाजातल्या शिकल्या सवरलेल्या चार मंडळींनी तरी? विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, यांनी या भागात काम केले म्हणजे काय केले? त्यांना यश आले असले तरी ते किती मर्यादित! आणि हा समाज खरोखरच जागा झाला, त्याच्या सामर्थ्याची चुणूक त्याची त्यालाच कळली तर...डोक्यात विचारांचे थैमान चालले होते. दत्ता देशमुख गर्जत होते–इंडिकेट–सिंडिकेटच्या वादात पडू नका. दोघे एकाच माळेचे मणी. जमिनीचे फेरवाटप झालेच पाहिजे. नांगराला जुंपलेल्या बैलागत आज तुमची अवस्था आहे. रक्ताचे पाणी करून अर्धपोटी राहून तुम्ही कष्ट करता आहात. आणि तुमच्या कष्टाने मिळालेल्या फळावर ही मंडळी माजली आहेत, –अधिक श्रीमंत होत आहेत.

जमलेल्या मंडळात मी फिरतो आहे.

करजगावचा म्हातारा सांगतो – घरात माणसे पाच, कष्ट उपसले तरी रोख पैका क्वचितच दिसतो. कापडाचा तुकडा, पसाभर जोंधळा मिळायचा, कधी मधी पैसा दिला तर भाग्य समजायचं. पैसा मागितला तर मालक पैसा हवा कशाला म्हणतो. भाकर तिखट आणि कधीमधी कालवन–तेही दिवसातून एकदाच.

देशमुख बोलतच असतात. मधेच त्यांच्या नावाचा जयजयकार चालू असतो. कुणी पक्षाच्या नावाने आरोळी ठोकत असतो. प्रत्येक श्रोत्याला आपला मुद्दा समजावा म्हणून देशमुखांचा प्रयत्न आहे. भाषा साधी, सोपी, दाखले त्याला पटतील असे–" शंभर भाकरी आहेत. खाणारे शंभर आहेत. पण आज अवस्था अशी आहे की सत्तर भाकरी, दहा लोक बळकावून बसले आहेत. सत्तर लोकांच्या वाट्याला दहा भाकरी आल्या आहेत. सत्तर भाकऱ्या बळकवलेल्या या दहांना आपण स्वस्थ बसू देणार?'

भाषेला धार येऊ लागली आहे. " आज जमिनीची अवस्था या भाकऱ्यांसारखी आहे. ७० टक्के जमीन १० टक्के शेतकऱ्यांकडे आहे. अशी परिस्थिती या पुढे चालणार नाही."

वरखेडचाचा सुंदर बनकर हा एक शेतमजूर. आधी मजूर, त्यात अस्पृश्य. त्याची

जमीन कोण्या बलाढ्याने दंडेली करून लुबाडली, त्याच जमिनीवर सुंदरला कामाला लावले. आणि मजुरी मागितल्यावर चोप देऊन हाकलून दिले. असा सुंदर माझ्याशी बोलतो आहे. लोकशाहीच्या, समाजवादाच्या–जातीय समानतेच्या सतत गप्पा ऐकणाऱ्या माझ्या शहरी मनाला हे पटू शकत नाही. बनकर फाटका कपडा काढून माराची निशाणी दाखवतो. मी चमकून उठतो.

दत्ताजींचे भाषण संपलेले असते. भाषणातील तळमळ मनाची पकड घेणारी वाटते.

ठाण्याच्या वारली लोकांमध्ये काम करणाऱ्या गोदावरीबाई परुळेकर अधिवेशनाच्या अध्यक्ष. भाषणाला उभ्या राहतात, बघता बघता सभा ताब्यात घेतात. हिंडण्याचे काम संपवून मी एका जागी उभा राहतो. अन्यायाचे अनेक दाखले बाई देतात. हाती सत्ता असल्याखेरीज तुमचे प्रश्न सुटणार नाहीत. पोलीस, सैन्य, कोर्ट आणि तुरुंग, हे आजच्या राजसत्तेचे चार पाय आहेत. अन्यायाविरुद्ध दाद मागाल, तर तुम्हालाच तुरुंग दाखवतील. कोर्टाकडून न्यायनिवाडा करायचा प्रयत्न कराल – कसा कराल ? पैसा आणि वेळ या दोन्ही गोष्टी तुम्हांला मानवणार नाहीत. पोलीस हा तर हस्तक, सत्तेतला वाटेकरी आहे. जमीनदार, जमीनमालक, यांच्याशी त्याचे साटेलोटे आहे. मालकाशी भागीदारी करून तो तुमची पिळवणूक करतो आहे. उरले सैन्य. त्यांच्यापर्यंत तुमचे प्रश्न पोचणार नाहीत अशी दक्षता घेतली जात आहे. मग तुमचे प्रश्न सुटणार कसे ? तुमचे दारिद्र्य संपणार कसे ? रोजगार सुधारणार कसा ? आहे. माझ्याजवळ यालाही उत्तर आहे. तुम्ही संघटित व्हा, सामर्थ्यवान व्हा, स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवण्यास सिद्ध व्हा. वेळ आलीच तर शस्त्र उचला. अरे बापरे नक्षलवादी विचार ! मी हबकतो. मंडळी एकाग्र चित्ताने ऐकत असतात. बाईंचा विचार त्यांच्यापर्यंत पोचला की नाही हे चेहऱ्यावरून कळत नसते. पण मंडपातील स्तब्धता अस्वस्थ करते.

हाती घेतलेल्या पुढच्या कार्यक्रमासंबंधी – चार मार्चच्या मुंबई अधिवेशन मोर्चासंबंधी यशवंत चव्हाण बोलतात, शेतकरी आणि कामगार एक झाल्याशिवाय क्रांती होत नाही. मुंबईतला कामगार आणि शेतात खपणारे तुम्ही यांची जेव्हा एकजूट होईल तेव्हा तुमचे प्रश्न सुटू लागतील.

नेवासेजवळील एका छोट्या खेड्यातून आलेल्या शिंक्रेशी मी बोलत असतो. शिंक्रेचे स्वतःचे छोटे शेत आहे. एक भाऊ मुंबईत आहे. तो काय करतो, कुठे असतो, त्याला पैसे किती मिळतात याची त्याला कल्पना नाही. हा गावी काय करतो, कसे चालवतो, यामध्ये मुंबईत राहणाऱ्या त्याच्या भावाला विशेष रस नाही. चव्हाणांच्या भाषणातील मुद्द्यावर मी विचार करतो आणि लक्षात येते. शहरात गेलेल्या त्याच्या भावाचा जीवनविषयक दृष्टिकोण बदलतो. त्याच्या अडचणी, त्याचे प्रश्न यांचे स्वरूप बदलते. 'दारिद्र्य' हा काही प्रमाणातील कॉमन

फॅक्टर आणि Family attachment चा भावनात्मक भाग सोडला तर या दोघां-मध्ये जवळीक निर्माण व्हावी असा दुवा सापडत नाही.

संध्याकाळचे खुले अधिवेशन रंगात आले होते. दुपारच्या कंटाळवाण्या कागदी (ठराव मांडणे, पास करणे, आदी) कामकाजापेक्षा या भाषणांमध्ये श्रोत्यांना विशेष गोडी होती. त्यांच्याशी बोलताना या गोष्टींची प्रचीती येत होती. प्रत्येकाजवळ सांगण्यासारखे काही तरी होते. विसाव्या शतकातही अक्षरश: गुलामगिरीचे जिणे जगणाऱ्या कुटुंबप्रमुखापासून ते या सभेसाठी सहा मैलांचे[1] अंतर पायी तुडवणाऱ्या वृद्धापर्यंत अनेक नमुने आढळून आले. दारिद्र्य आणि अज्ञान यांचे हे प्रातिनिधिक दर्शन पाहून मन चरकून गेले.

•

'माणूस' कार्यालयातून शनिवारी दुपारीच श्रीरामपूरला जाण्यासंबंधी फोन आला. रात्रीच्या सवारी गाडीने निघून रविवार ता. आठ रोजी श्रीरामपूरमध्ये दाखल झालो. अधिवेशनासाठी आलेली काही मंडळी गाडीमध्ये होती. त्यांनी दिलेल्या घोषणा अधूनमधून ऐकू येत होत्या. एखाद्या स्थानकावर नवीन मंडळी दाखल झाली की घोषणाच्या गजरामध्ये त्यांचे स्वागत होई. या सहप्रवाशांबरो-बरच स्टेशनमधून बाहेर आलो. पाहुण्यांच्या स्वागताला मंडळी आली होती. आलेल्या मंडळींना माझी ओळख देऊन येण्यामागील उद्देश सांगितला.

कार्यालयवजा इमारतीमध्ये बाहेरगावचे पाहुणे–शेतमजूर, भूमिहीन–जमा झाले होते. मधेच कोणी तरी सांगे–गोदाताई परुळेकर आल्या. लगेच त्यांचा जयनिनाद चाले. मंडळींची संख्या वाढत होती. आपण कशासाठी जमलो आहोत याची कल्पना असली तरी निश्चित कार्यक्रमाचा कुणालाच पत्ता नव्हता. कोणत्याही प्रश्नाला चिटणीसांपासून सर्व मंडळी एकमेकांकडे बोट दाखवून मोकळी होत. ९॥–१० पर्यंतचा वेळ असाच गेला. नेते मंडळी चर्चा करून काही निर्णय घेण्यात दंग झाली होती.

सोमय्या हायस्कूलसमोरील मैदानामध्ये मांडव घातला होता. थांबा, मांडव शब्दावरून गैरसमज होईल म्हणून खुलासा करतो. चारही बाजूंनी मोकळ्या मैदानामध्ये सुमारे शंभर बांबू खोवलेले आणि ऊन लागू नये म्हणून वरच्या बाजूने मिळतील ती रंगीबेरंगी कापडे बांधलेली. व्यासपीठ प्रेक्षकांपासून २–२॥ फूट उंच. साधे लाकडी फळ्यांचे. मंडपापासून दूर एका बाजूला प्रवेशद्वार म्हणून एक सामान्य कमान लटकवलेली. अशा अधिवेशनाच्या मुख्य ठिकाणाला भेट देऊन कार्यालयात आलो. मंडळी आपापसात चर्चा करत होती. अधिवेशनात ठराव झाल्यावर, आप-ल्याला जमिनी मिळतील का ? मजुरी वाढेल का ? असे प्रश्न माझ्यासारख्या चटकन ओळखू येणाऱ्या परक्या माणसाला विचारले जात होते. जमलेल्या पुढा-ऱ्यांना सरकार पैसे देते, अशी कित्येकांची ठाम समजूत असल्याचे दिसून आले. एक

एक सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकावयास मिळत होत्या. मंडपाकडे पुढारी मंडळी निघाल्याची वार्ता कोणीतरी आणली आणि गटागटाने मंडळी तिकडे रवाना होऊ लागली.

पाच हजारांच्या मंडपामध्ये सुमारे २–२॥ हजार मंडळी जमा झाली होती. अधिवेशनासाठी येण्यातील कष्ट लक्षात घेतले तर त्यातील प्रत्येकजण ३ ते ५ जणांचे प्रतिनिधित्व करत असावा, असा अंदाज करण्यास काहीच हरकत नाही.

प्रचाराचे पोवाडे आणि कलापथकाचा कार्यक्रम झाल्यावर कामकाजाला सुरुवात झाली. ११॥ वाजल्यापासून ३॥ पर्यंत चाललेल्या या बैठकीमध्ये प्रामुख्याने ठराव पास करण्याचे काम झाले. सर्व काम कंटाळवाणे आणि निरस वाटत होते. जमलेल्या श्रोत्यांचे भकास कोरे, चेहरे पाहून तर हा प्रकार विलक्षण ' बोअरिंग ' झाला.

बैठकीमध्ये १७ ठराव पास करण्यात आले. त्यांची धावती दखल घेणे अगत्याचे आहे.

–कसणाऱ्याची जमीन या तत्त्वावर जमीन मालकीची कमाल मर्यादा ठरवून–वरकड जमिनीची वाटणी.

–किमान वेतन ४ ते ६ रुपये मिळावे. तसा कायदा करून अंमलबजावणीसाठी यंत्रणा उभारा.

–जुनी सावकारी व सरकारी कर्जे माफ करा.

–अल्पव्याजाने कर्जपुरवठा करा.

–आदिवासी, नवबौद्ध, अन्य वन्य जमाती यांच्यावरील अत्याचार थांबवा.

–प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन करा, या प्रमुख मागण्या असून अन्य पूरक मागण्यांसह या सर्व मागण्या ठरावान्वये मंजूर करून घेण्यात आल्या.

कॉम्रेड डांगे या परिषदेसाठी मुद्दाम येणार असल्याची घोषणा करण्यात आली. सकाळच्या बैठकीचे काम चालू असतानाच डांगे आले. १५–२० मिनिटे बोलले. भाषणात नेहमीचा जोश नव्हता. आल्यासारखे भाषण करावे अशा वृत्तीचे ते भाषण वाटले. ते म्हणाले,

'वीस वर्षे होऊनही शेतकरी असंतुष्ट असल्याची जाणीव शासनाला झाली आहे. नुसते कायदे करून सुधारणा होत नसतात, याची प्रचिती आल्याने केंद्रीय गृहमंत्र्यांना राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावून शेतमजूर व भूमिहीनांच्या अडचणी सोडवण्याच्या प्रश्नाला प्राधान्य देण्याची विनंती केली आहे. शेतकरी वर्ग हातातून जाऊ लागल्यानेसत्ता जाऊ लागली आहे याची कल्पना राज्यकर्त्यांना आली आहे. जमीन-विषयक कायद्यांचे आणि विविध धरण योजनांचे फायदे विशिष्ट वर्गास मिळत असून गरीब शेतकरी आहे तियेच आहे. सहकारी कारखानदारीतून नवीन भांडवलदारी निर्माण झाली आहे. शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही. कारण अद्यापही मार्केट वर सटोडियांचे नियंत्रण आहे. राष्ट्रीयीकरण झाल्यावर विविध बँकांनी या वर्गाला

१६७ कोटी रुपयांचे कर्ज सौदेबाजीसाठी दिले ही वस्तुस्थिती आहे.'

भाषणाचा समारोप करताना श्री. डांगे म्हणाले, 'तुमचा प्रश्न केवळ आर्थिक राहिलेला नाही. आर्थिक–राजकीय अशा या प्रश्नांची सोडवणूक राजसत्ता हातात आल्याशिवाय होणार नाही.'

भाषणाची रेकॉर्ड वाजवून कॉम्रेड डांगे परतले. संध्याकाळच्या खुल्या अधिवेशनामध्ये त्यांचे सविस्तर भाषण होईल अशी अपेक्षा होती. तथापि अधिवेशनासाठी दिल्लीहून मद्दाम आलेल्या या गोरगरिबांच्या नेत्याने अधिवेशन अर्धे टाकून पळ काढला.

खुल्या अधिवेशनातील प्रमुख नेत्यांची भाषणे हा एकंदर कार्यक्रमातील सर्वांत यशस्वी भाग. त्याची दखल वर घेतली आहेच.

भूमिहीन आणि शेतमजूर यांच्या या गंभीर प्रश्नाचा केवळ महाराष्ट्रापुरता विचार करू. ग्रामीण भागातील सामाजिक शिडीच्या तळाशी हा वर्ग येतो. १९६१ च्या शिरगणतीनुसार शेतमजुरांची संख्या ४५ लाख होती. आज ती ५१ लाखांच्या वर आहे. हा मजूर शेतात काम करतो. पण जमीन त्याच्या मालकीची नाही. राहायच्या जागेवर मालकी नाही. रोजगाराची शाश्वती नाही. जगण्याचे एकमात्र साधन म्हणजे–स्वतःच्या श्रमशक्तीची विक्री आणि त्यापासून मिळणारा मोबदला, जेमतेम ३ रुपये. १९६१ साली प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या एका समितीने निर्वाळा दिला होता, की शेतमजुरांचे दरडोई वार्षिक उत्पन्न जेमतेम १०० रु. असते. म्हणजे महिन्याला त्याची प्राप्ती ८–९ रुपयांची असते. काय खाणार ? कसे जगणार ? एक-दोन नव्हे लाखो लोकांची ही अवस्था आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात शेतीवर जगणाऱ्यांचे प्रमाण ८० टक्के होते. आजही हेच प्रमाण टिकून आहे. मग गेल्या २२ वर्षांमध्ये झालेल्या विकासाचे काय ? परदेशांचे अवाढव्य कर्ज आणि बेसुमार महागाई, यांनी जनता त्रस्त झाली आहे. शेतकरी आहे तिथेच आहे. कायदे होत आहेत. मंत्र्यांचे दौरे चालू आहेत. ग्रामीण विकास योजनांच्या उद्घोषांनी ग्रामीण भाग दणाणून गेला आहे. पण तेथील समाज आहे तिथेच आहे.

शेतमजुरांप्रमाणे गरीब शेतकऱ्यांची अवस्था केविलवाणी आहे. महाराष्ट्रात ५ एकरांहून कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांची संख्या शेकडा ६० च्या वर आहे. हा शेतकरीही दारिद्र्याने गांजून गेला आहे. एकूण शेतीपैकी शेकडा ९३ टक्के जमीन कोरडवाहू आहे. आणि सरकारी अंदाजाप्रमाणे अशा जमिनीवर किफायतशीर शेतीचे क्षेत्र २० ते ३० एकर असते. मग ५ एकराच्या अथवा त्याहून कमी असलेल्या तुटपुंज्या शेतीवर हा गरीब शेतकरी काय करणार ? सावकारांचे उंबरठे झिजवण्यात आणि त्यांची घरे भरण्यात त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या खर्ची पडत आहेत. या छोट्या शेतकऱ्यांच्या मालकीची एकूण जमीन लागवडीखालील एकूण क्षेत्राच्या अवघी ७ टक्के आहे. या उलट २५ एकराहून अधिक जमीन असणाऱ्यांची संख्या जेमतेम ७ टक्के आहे. पण त्यांच्या मालकीची जमीन मात्र लागवडी-

खालील एकूण जमिनीच्या ४१ टक्के आहे. ५० एकरापेक्षा मोठया जमिनीची मालकी केवळ २ टक्के लोकांकडे असली तरी त्यांच्याकडे असलेल्या लागवडी-खालील जमिनीचे प्रमाण १७ टक्क्यांहून जास्त आहे. संपन्न शेतकरी हा या गोर-गरीब शेतमजुरांचा आणि छोटया शेतकऱ्यांचा सगळयात मोठा शत्रू आहे. जमिनीचा फार मोठा वाटा या वर्गाकडे असल्याने प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. स्वतःची जमीन नाही. रोजगाराचे साधन नाही. जगण्याची उमेद नाही. ही कोंडी फोडण्यासाठी जगण्याची उमेद घेऊन हा गरीब कलकत्ता-मुंबई-सारख्या औद्योगिक शहरांत हजारोंनी येत आहे. झोपडपट्टया वाढवत आहे. नवीन प्रश्न निर्माण होत आहेत.

जमीन सुधारणांच्या प्रश्नाबाबत महाराष्ट्रात दोन कायद्यांचा वारंवार उल्लेख करण्यात येऊन पुरोगामी धोरणांचे नगारे बडवले जातात. कुळकायदा आणि कमाल जमीन धारणा कायदा. कसणाऱ्याला संरक्षण देऊन जमिनीचे मालक बनवणे हा पहिल्या कायद्याचा उद्देश. पण प्रत्यक्षात अनेक कुळांची हकालपट्टी झाली. विदर्भात तर हे प्रमाण ८८ टक्के असल्याचे आढळून आले. स्वतः कसण्या-साठी जमीन घेण्याच्या कायद्यातील अधिकाराचा वापर करून, दमदाटी करून, प्रसंगी पैशाचा मोह दाखवून जमीनदारांनी आपले उद्दिष्ट साध्य करून घेतले.

कमाल जमीनधारणा कायद्यामध्ये कमाल मर्यादा एवढी मोठी आहे की भूमि-हीनांना वरकड जमीन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशांशी या मर्यादेचा संबंध राहत नाही. किफायतशीर क्षेत्राच्या चौपटीहूनही ही मर्यादा अधिक आहे. त्यात ही मर्यादा वैयक्तिक खातेदारावर, कुटुंबाच्या एकूण जमिनीवर नाही.

कायदा करताना शासनाचा अंदाज होता की या कायद्यामुळे सुमारे ११ लाख एकर जमीन वाटणीसाठी उपलब्ध होईल. पण १९६८ अखेरपर्यंत वरकड म्हणून जाहीर झालेली जमीन केवळ २ लक्ष ३५ हजार एकर आहे. त्यापैकी ८५ हजार एकर जमीन साखर कारखान्यांच्या मालकीची होती आणि कायद्याप्रमाणे तिची मालकी शेती महामंडळाकडे गेली. म्हणजे खाजगी क्षेत्रातून केवळ १॥ लाख एकर जमीन उपलब्ध झाली. आणि त्यातील १२००० एकर जमीन भूमिहीनांना वाटल्याची सरकारदप्तरी नोंद आहे.

जमीन सुधारणा कायद्यांची पाहणी करण्यासाठी योजना मंडळामार्फत नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. के. आर. नाणेकर यांची नियुक्ती झाली होती. आपल्या अहवालामध्ये ते म्हणतात, “ आगामी कायदेशीर बदलाची शक्यता लक्षात घेऊन मोठ्या जमीनदारांनी जमीन हातातून जाऊ न देण्यासाठी योग्य ते फेरफार करून टाकल्याचे दिसून येते. कायद्याचा उद्देश कुळांना, छोटया जमीन-मालकांना आणि भूमिहीनांना जमीन देण्याचा होता. तथापि विभक्तिकरणामुळे वाटली गेलेली जमीन जमीनदारांच्या कुटुंबात राहिली. १९५१–६१ या काळात

कुळांकडे वहिवाटीस असलेल्या जमिनीचे प्रमाण एकसारख कमी झाल्याचे दिसून आले. मोठ्या प्रमाणावर कुळांनी मालकांना जमिनी परत केल्या व कुळांची बेदखल झाली. ही कुळकायद्याच्या निष्फलतेची शोकांतिका आहे, "

१९५१–५२ व ६१–६२ या दोन शिरगणतीमधील माहितीचे पृथक्करण करून ' इकॉनॉमिक टाईम्स 'च्या संशोधन ब्यूराने असा निष्कर्ष काढला, की शेतकऱ्यांतील खालच्या थराची एकूण मालमत्ता ११ टक्क्यांनी घटली असून याच काळात वरच्या थराची मालमत्ता ७९ टक्क्यांनी वाढली आहे.

शेतमजूर-भूमिहीनांच्या प्रश्नाची सर्वांगीण कल्पना यावी म्हणून मुद्दाम वरील आकडेवारी दिली आहे.

घोषणांनी दारिद्र्य हटत नसते आणि भाषणांनी समाजवाद येत नसतो याची प्रचीती ग्रामीण भागात हिंडत असताना सातत्याने येते.

ग्रामीण भागातील श्रमजीवी मनुष्यबळ संघटित करण्याचे फारसे प्रयत्न आता-पर्यंत झाले नाहीत. जे थोडेफार झाले ते पक्षीय पातळीवरून, पक्षाच्या हितासाठी झाले आणि त्यातही निवडणुकांची बाजी मारण्याचा उद्देश प्रामुख्याने होता.

स्वत:चा देह झिजवून शहरी भाग जगवणारी ही मंडळी राहतात कशी, त्यांच्या अडचणी कोणत्या, त्यांचे निराकरण कसे करता येईल, यांचा सांगोपांग विचार, पक्षीय दृष्टिकोण बाजूला ठेवून अद्याप करण्यात आलेला नव्हता. श्रीरामपूरमध्ये अशा प्रयत्नांची फक्त पहिली मुहूर्तमेढ रोवली गेली. लाल निशाण, उजवे-डावे कम्युनिस्ट, सं. समाजवादी पक्ष, ही सर्व डावी मंडळी काही निश्चित योजना घेऊन ग्रामीण भागात आता उतरली आहेत. श्रीरामपूर येथील अधिवेशन ही या प्रयत्नांची नांदी म्हणावी लागेल.

अधिवेशन घडवून आणण्यामध्ये अनेक पक्षांचे सहकार्य असले, तरी खरी उचल लाल निशाण गट, आणि त्यांचे नेते दत्ता देशमुख यांची होती. अधिवेशन यशस्वी व्हावे म्हणून ही मंडळी अनेक दिवस खपत होती. कात्रे-बावळे हे चिटणीसद्वय प्रयत्नांची शिकस्त करत होते. गावोगावी पत्रके वाटण्यात आली होती.

एक दिवसाचे अधिवेशन संपवून रात्री एम्. टी. पकडली. डोळ्यासमोरून ते भकास आणि विलक्षण उदास चेहरे हालत नव्हते. गाडीतून बाहेर डोकावले तर संपन्न साखर कारखान्यांचा परिसर दिसत होता. ट्रक्स भरभरून उसांची धावपळ चालू होती. मोटार-सायकलींचे वाढते प्रमाण लक्षात येत होते. लांबसडक गाड्यांतून सहकारी कारखानदारी धावत होती. विषमतेची दरी रुंदावल्याचे भेसूर चित्र स्पष्टपणे दिसत होते.

सुन्न मनस्थितीत सकाळी उजाडता घरी आलो. ' सकाळ 'चा अंक पुढे धरून आई कुठल्यातरी गणेशयागाचे छायाचित्र दाखवत होती. आज आपण तिकडे जाऊ या का म्हणून विचारत होती.

□ □ □



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

### □ भारत दॅट इज इंडिया

कांदिवली–बोरीवलीला राहणाऱ्या माणसाने आपण मुंबईला राहतो असे सांगावे काय, किंवा खडकीला राहणाऱ्या इसमाने आपण पुण्याला (की पुण्यास ?) राहतो असे सांगावे काय हा तपशिलाचा प्रश्न नसून तत्त्वाचा आहे असे माझे स्पष्ट मत आहे. निदान दिल्लीला राहणाऱ्या सुज्ञाने तरी जुनी दिल्ली व नवी दिल्ली यातली लक्ष्मणरेषा चुकूनही ओलांडता कामा नये हे नक्कीच. परवा मी ती ओलांडली तेव्हा माझ्यावर जो दुर्धर प्रसंग ओढवला तो फक्त वैऱ्यावरच यावा. खरे म्हणजे जुन्या दिल्लीत राहणाऱ्या माझ्यासारख्या द्विपाद प्राण्याने डिफेन्स कॉलनी, गोल्फ लिंक असलेल्या ठिकाणी पाऊल ठेवणे म्हणजे मर्त्य मानवाने सदेह स्वर्गाला जाण्यासारखे आहे. पण या ठिकाणीही माणसेच राहतात अशा (गैर) समजुतीने मी एका पगारदार परिचिताकडे परवा पार्टीला गेलो. त्या अलिशान दालनात पाऊल टाकले तर समोर यजमानीणबाई उभ्या, म्हणून मी हात जोडून 'नमस्कार' म्हटले. पण त्या डोळे विस्फारून अन् श्वास रोखून माझ्याकडे पाहतच राहिल्या. इव्हिनिंग सूट न घातलेला इतकेच काय पण कंठलंगोट देखील न लावलेला हा आदिमानव आपल्या पार्टीला ? अन् डिफेन्स कॉलनीच्या पुण्यभूमीवर निमुळत्या बुटाच्या ऐवजी चक्क पाय मावतील एवढे सँडल ? माझ्याकडे बघून 'हुव्वा यू ?' पुटपुटत अन् दुसरीकडे बघून 'कुणाला बोलवायचं हे ह्यांना मुळी कळतच नाही.' असे जरा अधिक मोठ्याने पुटपुटत यजमानीणबाई मागे सरकल्या अन् मी त्या झगमगत्या गर्दीत स्वतःला लपवायचा प्रयत्न करू लागलो.


एका बाजूला काही प्रौढ मंडळींचा एक घोळका गंभीर मुद्रेने कसलीतरी चर्चा करीत होता म्हणून थबकलो, तर त्यातल्या एकाने चक्क मलाच सवाल केला, 'तुम्हाला काय वाटते, दिल्लीला व्हिस्कीची किंमत लंडनच्या दिडपट आहे, हे आपण किती दिवस सहन करायचे ?'' "छे बुवा, भलतीच महागाई," मी पुटपुटलो – कारण कोका-कोलाचे पंचवीस पैसे होते ते चाळीस झाल्याने महागाई वाढली आहे हे मला खरोखरीच पटले आहे. तरीदेखील व्हिस्कीच्या अर्थशास्त्राने आपले डोके गरगरायला लागायचे या भीतीने मी पुढे सटकलो. दुसरा घोळका

तरुण मंडळींचा होता. त्यातल्या एका तथाकथित तरुणाने आपली वेणी न घातलेली झुलपे बाजूला सारीत मला म्हटले, "तुम्हीच सांगा, डिस्कोथीकचा डेकॉर सायकेडेलिक असल्याशिवाय ॲड ॲट्मॉस्फिअर येईल का?" मी अर्थात् नाही म्हणून मान हलवली – कारण त्याने विचारलेल्या प्रश्न मराठीत होता की इंग्रजीत हेच मला समजले नाही.

असे दणदणा जिवावर बेतल्यावर जरा दुरून श्रवणभक्ति करणे हेच कमी धोक्याचे असे ठरवून मी एकीकडे झालो.... "अय्या, ती कोण ग तिकडे नायलॉन नेसून आलीय? पार्टीला कोणी नायलॉन नेसतात? हाउ स्टुपिड!...केवढ्याला ग हे फ्रेंच शिफॉन घेतलस?... एकशे पस्तीस! म्हणजे किती ग...? वन थर्टी फाइव्ह? हाउ चीप? मी वरवा टू हंड्रेडच घेतलं."..."छ बुवा, सबंध फिल्म फेस्टिवल पाहिली पण एकही ब्लू फिल्म नव्हती. – मागच्या वर्षी न्यूयॉर्कला गेलो तेव्हा खरी मजा आली."..."काय ग, तू म्हणे हल्ली बॉलरूम डान्सिग शिकतेस? कमाल आहे बाई, इतके दिवस कसं ग सरवलंस?"..."मी सांगून ठेवतो मिस्टर, या आपल्या गावठी इंडियन लोकांना टेबल मॅनर्स शिकविल्याशिवाय इंडिया मॉडर्न होणे शक्य नाही."... "काय म्हणतोस काय? पाच वर्षे झाली तरी तू तुझी ॲम्बॅसॅडर गाडी बदलली नाहीस?–छे बुवा, आपण नाही असल्या डर्टी इंडियन वस्तूंना इतके चिकटून राहत."..."आमचा बॉबो किनई भारीच हुशार आहे हो, – परवा बागेत घालायला पाणी नव्हते तर त्याने चक्क फ्रिजमधल्या डझनभर कोकच्या बाटल्या काढल्या अन् बागेत ओतल्या."..."अहो, आमच्या ज्योतीला – आम्ही तिला ज्युली म्हणतो – मराठी येतच नाही, पण इंग्लिश असे फाडफाड बोलते – भारी कौतुक वाटतं बाई..."

या पार्टीहून परत आल्यापासून मी 'माणसा'त जमा होण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. म्हणजे मी उजव्या हाताने माझ्याच डाव्या हाताशी शेकहँडची प्रॅक्टीस करतो. जेवायला पाटावर बसतानाही पॅंट घालतो. अन् शुद्ध मराठीच्या ऐवजी अशुद्ध इंग्रजी बोलायचा सुसंस्कृत नियम कटाक्षाने पाळतो.

□ □ □



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२१ ते २७ फेब्रुवारी १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सुखकारक आहे. पहिला शनी, बारावा मंगळ, रवी-राहू-शुक्र अकरावे, बुध दहावा व गुरू सातवा असे सारे ग्रह शुभफलदायी आहेत. चंद्राचे भ्रमण पाच, सहा व सातव्या घरातून आहे. पहिले दोन दिवस मानसिक त्रास होईल. भागीदार व पत्नीकडून मदत होईल. ता. २३।२४।२५ अचानक धनलाभ होईल. ता. २५ ला मंगळ मेषेत जातो. शनी-मंगळ राशीत येतात. २६।२७ ला प्रवासात अचानक धनप्राप्ती. यंत्रांशी निगडीत असलेल्या वाहतुकीसारख्या धंद्यात अमाप फायदा. जमीन अगर रहाण्याच्या जागेचे व्यवहार यशदायी होतील. महत्वाकांक्षा पुऱ्या होतील. सार्वजनिक कामात भरघोस यश मिळेल. च, ल, अ या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा २३ ते २७

**वृषभ** : या सप्ताहात शनी-मंगळ (२५ तारखेनंतर) बारावे, रवी-राहू-शुक्र दहावे, बुध नववा व गुरू सहावा असे अशुभ फलदायी ग्रह आहेत. पत्नी आजारी पडण्याचा योग आहे. भागीदाराशी तीव्र मतभेद. मानहानी. वडील माणसे आजारी पडतील. सुखनाश. विद्येत मात्र यश मिळेल. साहित्य व शास्त्रीय लिखाण होईल. मातुलाकडून मदत होईल. शत्रूंचा पाडाव होईल. ता. २५ नंतर हा अनुभव विशेष येईल. चंद्राचे भ्रमण ४।५।६ या घरातून आहे. ते शुभफलदायी आहे. ३१ ते ३६ वयातील व्यक्तींना लिखाणात प्रसिद्धी मिळेल. सरकारी अगर सहकारी कामात अत्यंत त्रास पडूनही यश मिळणार नाही ती कामे पुढे ढकलवी. सिंडिकेटच्या चळवळीला अत्यंत जोर चढेल. व, ब, अगर स्वरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा २५।२६।२७

**मिथुन** : शनी-मंगळ एकादशात, ता. २५ नंतर रवी-शुक्र-राहू नवमात, बुध अष्टमात व गुरू पंचमात. चंद्राचे भ्रमण ३।४।५ या घरातून आहे. ते शुभ आहे. सुखनाश, घराबद्दलच्या व्यवहारात अपयश. मित्रांकडून फसवणूक होईल. अचानक धनलाभ होईल. पैशाचे व्यवहार २५।२६।२७ ला फारच जपून करावेत. विद्या- भ्यासात यशप्राप्ती होईल. नोकरीच्या खटपटीला दिवस चांगले. वडील भावंडाकडून

त्रास होईल. संतती चांगली वागेल. ता. २४।२५ ला धनलाभ होईल. ता. २६।२७ ला सर्व बाबती चांगल्या जातील. ज्या व्यक्तींची नावे क, प, ध नी सुरू आहेत. त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २६।२७

**कर्क** : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला धनप्राप्ती करून देणारे आहे. शनी-मंगळ ता. २५ नंतर दहावे, रवी-शुक्र-राहू आठवे, बुध सातवा व गुरू चवथा. धनलाभ चांगला होईल. सार्वजनिक कार्याला पैसा गोळा करण्याला दिवस चांगले आहेत. भागीदारांकडून सर्व बाबतीत साहाय्य होईल. एकच एक राजयोगकारक ग्रह मंगळ दशमात-सप्तमेशाबरोबर आहे. मानमान्यता वाढेल. पहिले दोन दिवस मानस्वास्थ्य बिघडेल. राग आवरावा लागेल. घराची कामे ता. २६।२७ ला करावी. संततीला यश प्राप्त होईल. मिलिटरीत नोकरीचा प्रयत्न करण्याला आठवडा फार चांगला आहे. ज्या व्यक्तींची नावे ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

**सिंह** : या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला शुभफलदायी आहे. शनी-मंगळ भाग्यात, रवी-राहू-शुक्र सप्तमात, बुध सहाव्या घरात व गुरू तृतीयात असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. एकच एक राजयोगकारक ग्रह मंगळ चतुर्थेश व भाग्येश मंगळ सप्तमेश शनीबरोबर ता. २५ नंतर भाग्यात आहे. घराबद्दलचे सर्व व्यवहार मित्रांच्या व भागीदारांच्या सहाय्याने निर्विघ्न पार पडतील. पैशाची अडचण ता. १।३ पर्यंत जाणवेल. चंद्राचे गोचरी भ्रमण लग्न, धन व तृतीयातून आहे ते शुभफलदायी आहे. अचानक धनलाभ ता. २६।२७ ला होईल. सार्वजनिक कामात यश मिळेल. लॉटरीची तिकिटे घेण्याला ता. २६।२७ विशेष चांगल्या आहेत. ज्या व्यक्तींची नावे ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

**कन्या** : या सप्ताहात आठवे शनी-मंगळ ता. २५ नंतर सहावा रवी-राहू-शुक्र दुसरा गुरू व पाचवा बुध. असे बुध-गुरूखेरीज सर्वच ग्रह वाईट आहेत. धननाश-विद्याभ्यासात अपयश. आत्मघातकी विचार मनात येतील. पराक्रमाला कमीपणा. भागीदाराशी नसते वितंडवाद होतील. शत्रूचा जोर होईल. सरकारी कामात अपयश. संततीशी विरोध. फक्त शुभ गुरू व बुध या सर्व आपत्तीतून सुखरूप बाहेर आणतील. २६।२७ तारखांना पैशाची विस्कटलेली घडी परत नीट बसेल. येणे असलेले पैसे अचानक हातात पडतील. ज्या व्यक्तींची नावे प, फ, ञ, ज्ञ, भ, थ, छ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

**तूळ** : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला भोगदायक आहे पहिला गुरू चौथा बुध, पाचवे रवी राहू-शुक्र, सातवे शनी मंगळ ता. २५ नंतर असे सर्व ग्रह

शुभ फलदायी आहेत. गृहसुख चांगले लाभेल. शत्रूकडूनसुद्धा मदत होईल. विद्येत यश येईल. चंद्राचे भ्रमण एकादश व्यय व प्रथम स्थानातून आहे ते चांगले. घर जागा जमीन यांचे व्यवहार फार फायदेशीर होतील. बौद्धिक व्यवहार करणाऱ्यांना सर्व बाजूंनी यश येईल. सरकारी व सार्वजनिक कामात यश येईल. ता. २१।२२ जरा मानसिक स्वास्थ्य बिघडेल. धनलाभ चांगला होईल. वडील भावंडांकडून व मित्रांकडून चांगली मदत होईल. भागिदारांकडून व पत्नीकडून धनलाभ होईल. मेडिकल उपकरणाचे व्यापारी, प्रसाधनाचे व्यापारी यांना फायदा होईल. च, ल, र, त, अ या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थाची नावे असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २६।२७

**वृश्चिक** : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला सौख्यकारक आहे. बारावा गुरू, तिसरा बुध, चौथे रवी-शुक्र-राहू. सहावे शनी-मंगळ. ता. २५ नंतर असे सर्व ग्रह शुभफलदायीच आहेत. व्ययातील गुरूमुळे धननाश व संततीशी विरोध निर्माण होईल. मिलिटरीमधील व्यक्तींना उच्चपद प्राप्त होईल. घरात शुभ समारंभ होतील. विद्येत अपयश येईल. सरकारी व सहकारी कामात भरघोस यश येईल. चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे. पैकी ता. २६।२७ ला खर्च जास्त होईल. संततीकरिता खर्च करावा लागेल. ता. २१।२२ला मानमरातब मिळेल. प्रवासातून फायदा होईल. या राशीच्या माणसांचे समाधान कधीच होत नाही. न, य, व, ब आणि स्वरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. या राशीच्या लोकांचा राजकारणात इंडिकेटच्या बाजूने कल राहील.

शुभ तारखा २१।२२।२३।२४।२५

**धन** : या सप्ताहातील ग्रहमान धनराशीला थोडेसे संमिश्र आहे. दुसरा बुध, तिसरे रवी-राहू-शुक्र, पाचवे मंगळ-शनी ता. २५ नंतर अकरावा गुरू असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. विवाहाची बोलणी यशस्वी होतील. विद्येत थोडा खंड पडेल. विशेषतः सायन्सच्या विद्यार्थ्यांना वाईट दिवस जातील. धनलाभ चांगला घडेल. व्यापारात चांगला फायदा होईल. मशिनरी, कॉंट्रक्टच्या धंद्यात लाभ होईल. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या घरातून आहे. ते शुभ आहे. अचानक धनलाभाचा योग २३।२४ तारखांना येईल. थोडासा मनःस्ताप होईल. कलेमध्ये यश मिळेल. या राशीच्या माणसांना ध्येय फार मोठे असते. त्यांचे समाधान कधीच होत नाही. ता. २६।२७ अचानक धनलाभाच्या दृष्टीने फारच चांगल्या आहेत. सर्व आठवडा चांगला आहे. क, ध, भ, घ, छ, थ, या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे असतील त्यांनाही वरीलप्रमणेच फळे मिळतील.

**मकर** : या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला भोगदायक आहे. पहिला बुध, दुसरे रवी-शुक्र-राहू, चौथा मंगळ-शनी ता. २५ नंतर व दहावा गुरू असे सर्व ग्रह

शुभफलदायी आहेत. मानमरातब होईल. धनलाभ भरपूर होईल. लग्नेश चतुर्थात चतुर्थेशाबरोबर आहे व त्यावर गुरूची दशमातून दृष्टी आहे. सुखवृद्धी, स्थावर, जमीन खरेदी करण्याला दिवस चांगले. विद्येत अडथळा येईल. धनलाभ चांगला होईल. सरकारी कामांत यश येईल. चंद्राचे भ्रमण ८।९।१० या घरातून आहे. पैकी ता. २१।२२ थोडीशी मनःशांती बिघडेल व धननाश होईल. ता. २५।२६ ला व्यापाऱ्यांना-विशेषतः प्रसाधने, मशिनरी, मेडिसिन अशा व्यापारात खूप नफा होईल. ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरील-प्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २५।२६।२७

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला प्रवासयोग घडविणारे आहे. लग्नी रवी-शुक्र-राहू, व्ययात बुध, तृतीयात शनी-मंगळ व ता. २५ नंतर भाग्यात गुरू, असे शुभग्रह आहेत. पहिले दोन दिवस मानसिक त्रास होईल. भागीदारां-कडून व पत्नीकडून विरोध होईल. विद्याभ्यासात अपयश. भावंडाकडून त्रास व पराक्रमाला कमीपणा. सरकारी कामाला दिवस चांगले नाहीत. ता. २५ पर्यंत मेडिकल व्यवसायातील लोकांना दिवस शुभ आहेत. धनलाभ होईल. आयत्या वेळी मित्रांची मदत होईल व बदनामी होण्याचे टळेल. या राशीची माणसे आत्म-घातकी वृत्तीची असतात. राग आवरावा. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या घरातून आहे. ता. २५।२६।२७ ला धनलाभ होईल. सासरा किंवा मामाकडून पैशाची मदत होईल. ज्या व्यक्तींची नावे ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २५।२६।२७

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला सुखकारक आहे. लग्नी मंगळ ता. २५ पर्यंत आहे. तो चांगला आहे. धनात शनी-मंगळ, व्ययात रवी-शुक्र-राहू, अकरावा बुध व आठवा गुरू. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे. शत्रुनाश होईल. विद्याभ्यासात अपयश. संततीकडून त्रास, धननाश, वाचाशुद्धी कमी होईल. सार्वजनिक कामात अपयश. मानमरातबाला कमीपणा येईल. ता. २३।२४ ला धनयोग चांगला आहे. मागील येणे वसूल होईल. अपचनाचे विकार होतील. २५ नंतर मंगळ शनीवर येईल व समोरून गुरू त्यावर पाहील. हा योग अचानक धन-लाभाला चांगला आहे. मित्रांकडून मदत होईल. रक्तदाब अगर मधुमेहासारखे रोग होण्याचा संभव आहे. ४२ वयाच्या पुढील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. ज्यांची नावे द, फ, झ, ञ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २२।२३।२४।२५

□ □ □

येथे राहत होती. मला बसायला घोंगडं वगैरे टाकून वाटाड्या आधीच आत गेला होता. त्याची काहीतरी खुडबुड सुरू होती. पण चहा वगैरे तर काही झालेला दिसत नव्हता. म्हणून गमतीने मी सहज बोलत होतो.

गुळाचा चहा मला कसा द्यायचा म्हणून बहीण अडखळली होती. घरात साखरेचा दाणाही नव्हता.

असेच हे लोक वर्षानुवर्षे येथे राहत आहेत. कोणी चौकशीला येत नाहीत. जात नाहीत. माझ्यासारख्या अवचित येणाऱ्याजाणाऱ्यांवर त्यांचा मुळीच विश्वासही बसत नाही. वाटाड्यास सांगत होता, असे एकदम कोणी आले की हा सरकारी माणूस काहीतरी माहिती गुप्तपणे काढायला हिंडतोय, अशीच या माणसांची प्रथम समजूत होते. त्यामुळे खरे दुःख ती सहसा सांगायलाच प्रथम तयार होत नाहीत. मी त्यांच्या ओळखीच्या, नात्यातल्या माणसाबरोबर आलो होतो. म्हणून बक्कन ती म्हातारी गांडूळ ओकून मोकळी झाली होती.

सकाळपासून मी अशा दोन वस्त्यांवर थांबलो होतो. एकच रड, तीच ओरड. पाणी नाही, पाणी नाही. हे तर ऐन थंडीचे दिवस होते. तरी लांबून पाणी आणायला सुरुवात झाली होती. उन्हाळ्यात तर थेट किल्ल्यावर जावे लागते— पिण्याच्या पाण्यासाठीही. गुरे कुठे न्यायची ही काळजी आतापासूनच लागली होती. म्हणून या वस्त्या ओस पडत चालल्या होत्या, जवळजवळ पडलेल्या होत्या. दोन-चार झोपड्या–गाठेच ते–म्हातारं माणूस आणि गुरे वळण्यासाठी ठेवलेली एक–दोन मुले. पूर्वी वेगळं होतं काहीतरी उद्योग हाताशी होता. मुख्यतः गुरे सांभाळण्याचा. चारा पाण्याची सोय होती. आता डोंगर उजाड झाला, पाणी आटले. माणसे उद्योगासाठी शहरात पळाली. कुणाची हातगाडी, कुणी स्टेशनवर हमाल, ऑफिसमधील शिपाई, असा जो तो कुठेकुठे चिकटला आणि झोपडपट्ट्यांच्या ढिगाऱ्यात हळूहळू दिसेनासा झाला. शहरात बसून, सचिवालयात बैठक बोलावून आम्ही झोपडपट्टी निर्मूलनाच्या योजना आखीत आहोत, त्यांच्या मागण्यांसाठी मोर्चे वगैरे निघतात. याने हा प्रश्न कधीच सुटणार नाही. हा ओघ जिथून निघतो, तिथेच तो अडवला पाहिजे. रोगाचे मूळ उपटले पाहिजे. हे वाटते तितके अवघड नाही. फक्त दृष्टी हवी, कार्यक्षम यंत्रणा हवी. डोंगरावरची शेती, बागायती वाढवली पाहिजे. दगडधोंड्यांनी भरलेल्या उतरत्या निकृष्ट जमिनीत आबा करमरकरांसारखा उपक्रमशील शेतकरी ज्वारीचे विक्रमी पीक घेऊ शकतो, हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. इथे, या डोंगरांवर मग काही पिकू शकणार नाही ? खाजगी जंगलांच्या लागवडीचा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. पशुधनाच्या विकासाची एखादी योजना येथे यशस्वी होऊ शकेल. बांबूची वने

येथे माजावीत, आंबा-काजूच्या बागा येथे डोलाव्यात. समोर पानशेतचा विस्तीर्ण जलाशय आहे. खडकवासला जवळ आहे. उद्या वरसगावचे धरण तयार होईल. वर गडावर पाण्याची टाकी आहेत-आणि येथे वस्तीला माणूस राहू शकत नाही! कमरेत वाकलेल्या ऐंशी वर्षांच्या म्हातारीला दोन-दोन मैलांवरून पिण्याचे पाणी वाहून आणावे लागावे! गांडुळे कुठली तर मग? ही माझ्यासमोर खवळून बोलणारी हाडामांसाची माणसे, की दिल्ली-मुंबईतल्या एअरकंडिशन्ड खोल्यांत वसून यांच्या विकासाच्या योजना आखणारे थोर थोर पुढारी? त्यांचे सचीव, उपसचीव? त्यांच्यासाठी अहवालांचे ढीग रचणारे वडेवडे विद्वान्, तज्ज्ञ, जाणकार?

याच परिसरात तो वृद्ध तपस्वी भागवत आपले प्रयोग करीत करीत झिजून गेला. पण या तथाकथित संशोधक अधिकाऱ्यांना, वड्या सत्ताधाऱ्यांना तिकडे ढुंकूनही पाहण्याची कधी बुद्धी झाली नाही. भागवत एस्. आर. एकांडे होते, हेकट होते, लोकांचे आणि त्यांचे यामुळे कधीच जमू शकले नाही हे खरेच. पण त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न मूलभूत समजून त्याचा काही अधिक पाठपुरावा होऊ नये, हा त्यांच्यावर झालेला अन्यायच आहे. ज्या भागात डोंगरमाथ्यावर दीडशे दोनशे इंच पाऊस पडतो तेथे तळाशी राहणाऱ्या लोकांना वर्षातून तीन-चार महिने पिण्याच्या पाण्यासाठीही वणवण भटकावे लागावे, हा विरोधाभास त्यांना खटकला, ही विसंगती त्यांना बोचली आणि एकट्याच्या बळावर हा विरोधाभास, ही विसंगती कमी करण्याचा त्यांनी दहा-बारा वर्षे सतत प्रयत्न केला. डोंगरउतारावर ताली घालता घालता त्यांच्या हाडाची काडे झाली, राहत्या घरादारासकट सर्व संपत्तीची धुळधाण उडाली. किती शेतीतज्ज्ञांनी, जलसंशोधकांनी, सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांचा हा प्रयोग समजावून घेतला, त्यातील उणीवा दूर करून अधिक शास्त्रीय पायावर, व्यापक प्रमाणावर तो यशस्वी व्हावा यासाठी धडपड केली? बहुतेक धेंडांनी त्यांची त्या वेळी टिंगल-टवाळीच केली. केंद्रीय मंत्री के. एल्. राव यांचा अपवाद वगळता एकही मंत्री इकडे फिरकलादेखील नव्हता त्या काळात. दोन इंच पाऊस पडणाऱ्या भागात इस्रायलने नंदनवने कशी फुलवली यावर रसभरीत व्याख्याने मात्र दिली गेली-दिली जातातही; तो चमत्कार अभ्यासण्यासाठी येथून तज्ज्ञांची टोळकी पळत असतात. पण कुठल्याही देशाची प्रगती असे दुसऱ्याचे पाहून, अनुकरण करून होत नसते. त्यासाठी स्वतंत्र प्रश्न उपस्थित करणारे संशोधकच लागतात, आपल्या आसपासचे विरोधभास कुठेतरी, कुणालातरी बोचावे लागतात. विसंगती खटकावी लागते. वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षी वडिलांना गीता वाचून दाखवीत असताना सुरुवातीला शस्त्र खाली ठेवणारा अर्जुन अठराव्या अध्यायाच्या शेवटी ज्या अर्थी युद्धाला प्रवृत्त झालेला दिसतो, त्या अर्थी गीतेत संन्यासाचे प्रतिपादन नसावे, दुसराच काहीतरी गीतेचा संदेश असावा, अशी शंका एखाद्या बाळ गंगाधराला येते आणि

नंतर स्वतंत्र संशोधनाच्या वाटेने जात जात अखेरीस तो गीतारहस्याचा उद्गाता ठरून जातो. भौतिक शास्त्रातील संशोधनाची वाटचालही यापेक्षा वेगळी नसते. 'पीसा'च्या मनोऱ्यावर गॅलीलिओ चढला तेव्हाच युरोपात विज्ञानाचा उदय झाला. तोवर हजार–बाराशे वर्षे पढीक पांडित्य तेथेही ज्ञान म्हणून मिरवीतच होते. चार यंत्रे देशात धडधडली. विज्ञानविषयक भाषांतरित पुस्तकांची रेलचेल माजली, की देशात शास्त्रीय प्रगतीचे युग अवतरले अशी आपली उथळ समजूत आहे. ही यंत्रे चालविणारे, भाषांतरे करणारे–वाचणारे मन शास्त्रीय दृष्ट्या अगदी आंधळे, सामाजिक दृष्ट्या अगदी जुनाटही असू शकते. नव्हे, आपल्याकडे ते बहुतांशी तसेच आहे. असंख्य भागवतांच्या अपयशातूनच वैज्ञानिक यशाची वाटचाल सिद्ध होत राहते. एक नाही, चार कृषी विद्यापीठे जरी काढली तरी जोवर भागवतांसारखे कुणी अस्वस्थ होऊन विचार करणारे त्यातून बाहेर पडत नाहीत, त्यांची समाजाकडून बूज ठेवली जात नाही, त्यांच्यासारख्यांच्या प्रयत्नांचा पाठपुरावा करणारी साखळी निर्माण होत नाही, तोवर ही बाहेरून आयात केलेली शास्त्रीयता, हे चिकटवलेले विज्ञानप्रेम पोकळच आहे. प्रगत औद्योगिक देशांनी फेकलेली चार उष्टी शिते एवढीच याची मातबरी.

चार संशोधक–चार अधिकारी यांना काही दिवस वर किल्ल्यावर बंद करून ठेवले पाहिजे. या भागातील पाण्याच्या प्रश्नावर उपाययोजना शोधून काढल्याशिवाय त्यांची सुटका न केली पाहिजे–माझे मन या स्वप्नरंजनात सारखे दंग होत होते. आणि वाटाड्या मात्र मला त्याच त्याच जुन्या कथा, मला त्यातले काही माहीत नसावे या समजुतीने ऐकवीत होता. उदयभानूने देवलदेवी–कमलकुमारीला कसे अडकवून ठेवले होते, लग्नाची त्यांच्यावर कशी सक्ती केली जात होती, तान्हाजीला हे कसे कळले . वगैरे. मला मात्र आज या भागातील सर्वच गरीब जनतेला कुणीतरी अडकवून ठेवले असल्याचे जाणवत होते. उपासमारीत खितपत पडण्याची, पाण्यासाठी तडफडण्याची तिच्यावर सक्ती केली जात आहे आणि तान्हाजी तर कुणी दृष्टिपथातही नाही. दोर कापण्याच्या गप्पांना मात्र खूपच रंग चढला आहे.

क्रमशः

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



" 'आपल्या मंडळींवरील आरोप,' 'आपल्या मंडळींवरील आरोप' असं म्हणून मला तुमच्यात गोववू नका. तुमच्यावरील ३६ आरोपांपैकी ३२ सिद्ध झाले आहेत तर माझ्यावरील १८० आरोपांपैकी फक्त पाचच सिद्ध होऊ शकलेले आहेत, लक्षात ठेवा ! ... "